रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २२२
www.ramprahar.com
◆ शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

राजिपसह पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्यपदाची संधी/२
खालापूर तालुक्यात दोन अपघातांमध्ये दोघे ठार/५
महाराष्ट्र कबड्डी संघाची राष्ट्रीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक/८

## ‘मराठीला ज्ञानभाषेत रूपांतरित करून पुढील पिढीपर्यंत नेऊया’



**मुंबई** : जगात ज्ञानभाषा असलेल्या भाषाच पुढे प्रवाहित होत असल्याचा इतिहास आहे. ज्या भाषेतून व्यवहार चालतो, रोजगार मिळतो ती भाषा प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे आपल्या अभिजात मराठी भाषेला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध अशी मराठी भाषा आपण पुढील पिढीपर्यंत नेऊया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. ते विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित जावे विनोदाच्या गावा या विशेष कार्यक्रमात बोलत होते. व्यासपीठावर विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड.राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आदी उपस्थित होते. **(सविस्तर पान २ वर..)**




### ‘हिंद दी चादर’ गुरू तेग बहादूर यांचा ३५०वा शहिदी समागम

# खारघरमध्ये आज आणि उद्या भव्य कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदुस्थानी संस्कृती आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे ‘हिंद दी चादर’ श्री गुरू तेग बहादूर साहिब यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ओवे येथील मैदानात होणाऱ्या कार्यक्रमासाठी मान्यवरांसह देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या तयारीचा अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ, भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर तसेच शासकीय अधिकाऱ्यांनी आढावा घेतला.

कार्यक्रमास पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थितांना संबोधित करणार आहेत तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्यासह इतर विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नेतेमंडळी, योगगुरू बाबा रामदेव, बागेश्वर धाम पीठाधीश्वर धीरेंद्र कृष्ण शास्त्री, दिदी साध्वी ऋतंभरा उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर शिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन तसेच भगत नामदेव संप्रदाय या समाजातील संत आणि रागी जत्थेदार उपस्थित राहणार आहेत.



> *खारघरच्या पावन भूमीवर होत असलेल्या ‘हिंद दी चादर’ गुरू तेग बहादूर साहिब यांच्या ऐतिहासिक ३५०व्या शहिदी समागमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. लाखो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा अभूतपूर्व ठरेल.*
>
> ***-आमदार प्रशांत ठाकूर, भाजप प्रदेश चिटणीस***

या कार्यक्रमाच्या निमित्ताने ’नगारा फतेह दा’ या धार्मिक गीताचे लोकर्पण पूर्वसंध्येला झाले. राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी दोन दिवसीय कार्यक्रमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने पाहणी करून आढावा घेतला. त्यांच्यासमवेत पनवेलचे महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, कोकण विभागीय आयुक्त विजय सुर्यवंशी, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, समाजाचे नेते जसपाल सिंग सिद्धू, हॅप्पी सिंग, मलकीत सिंग, हरजीत सिद्धू, समन्वयक रामेश्वर नाईक, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, नगरसेवक, नगरसेविका, शासकीय अधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### बलिदानाचा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहचवू -राज्यमंत्री माधुरी मिसाळ

‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५०व्या शहिदी समागम वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाने नागपूर, नांदेडनंतर आता नवी मुंबई येथे या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. देशासाठी बलिदान देणाऱ्या महान व्यक्तींचा इतिहास आणि त्यागाची गाथा पुढील पिढीपर्यंत पोहचवणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन अल्पसंख्याक आणि औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी केले. त्यांनी प्रशासन, विविध विभागांचे अधिकारी आणि स्वयंसेवक यांच्याशी संवाद साधत कार्यक्रमाची सविस्तर माहिती घेतली.

## कल्याणमध्ये भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात चिमुकल्याचा मृत्यू

**कल्याण : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वीच कुत्र्याच्या चाव्यानंतर भीतीतून एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात सात वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाल्याने कल्याण शहर हादरले आहे. आणखी एक मुलगा जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार कल्याणजवळील मोहने गाळेगाव परिसरात रस्त्यावर खेळणाऱ्या दोन मुलांवर भटक्या कुत्र्यांनी अचानक हल्ला केला. या हल्ल्यात दोन्ही मुले गंभीर जखमी झाली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान सात वर्षीय खुशील वाघे याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, सातत्याने घडणाऱ्या या घटनांची प्रशासनाने दखल घेत आवश्यक पावले उचलण्याची मागणी केली जात आहे.

## राजिप अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीचा कार्यक्रम जाहीर

### १२ मार्चला विशेष सभा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेतील सत्तास्थापनेसाठी तारीख निश्चित झाली आहे. जिल्हा परिषदेच्या नवीन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीचा कार्यक्रम जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जाहीर केला असून १२ मार्च रोजी यासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

अलिबाग येथील नियोजन भवनच्या सभागृहात १२ मार्च रोजी दुपारी २ वाजता नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्यांची बैठक होणार आहे. याच बैठकीत नवीन अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड केली जाईल. तत्पूर्वी याकरिता सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत अर्ज दाखल होतील. जिल्हा परिषदेची निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी पार पडली. त्यानंतर ९ रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर झाले.

जिल्हा परिषदेतील नवीन कारभारी कोण असतील याची सर्वांनाच प्रतीक्षा आहे. ग्रामविकास विभागाने या संदर्भात पत्रक काढून २० मार्चपूर्वी जिल्हा परिषद सदस्यांची पहिली बैठक घेऊन अध्यक्ष, उपाध्यक्षपदाची निवड



प्रक्रिया पूर्ण करावी, असे आदेश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार रायगड जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांची पहिली बैठक १२ मार्च रोजी होणार असून याच बैठकीत अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड होणार आहे.

### पं.स. सभापती, उपसभापतींची ११ मार्चला निवड

रायगड जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांच्या सभापती, उपसभापती निवडीचा कार्यक्रमदेखील जाहीर झाला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या कार्यक्रमाप्रमाणे पंचायत समिती सभापती आणि उपसभापती निवडीसाठी ११ मार्च रोजी विशेष सभांचे आयोजन करण्यात आले आहे.



**पनवेल : भाजयुमोचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचे शुक्रवारी पनवेलमध्ये कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत करून अभिनंदन केले. यावेळी नगरसेवक अमर पाटील, नगरसेविका शिवानी घरत, भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, चिन्मय समेळ, रोहित जगताप, पनवेल मंडळ अध्यक्ष हिमेश बहिरा, मयुर कदम, मयुर शेळके, गौरव कांडपिळे, अक्षय सिंग, देवांशू प्रभाळे, शुभ पाटील, वरुण डांगर, यश भोईर, अनिमेश ओझे, अनिमेश पटवर्धन, रोहित कोळी, जिज्ञेश मोहोकर आदी उपस्थित होते. युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने महाडिक यांचा सत्कार करण्यात आला.**

## पेण कोळीवाड्यात गगनचुंबी होळी



**पेण : प्रतिनिधी**

कोकणात सध्या होळीचा सण साजरा करण्यासाठी जोरदार तयारी सुरू झाली आहे. पेण कोळीवाड्यात समाज बांधवांनी ४० फूट उंच होळी सजवून उभारली असून हुताशनी पौर्णिमेच्या दिवशी अर्थात २ मार्च रोजी नाच, गात जल्लोष केला जाणार आहे.

या दिवशी विविध कार्यक्रम आयोजित करून पारंपरिक वेशभूषेत समाजाचे निखळ मनोरंजन केले जाते. त्यानंतर पुरणपोळी व इतर गोडधोड पदार्थांचा नैवैद्य होळी समोर दाखवून पौर्णिमेच्या रात्री होळी पेटवली जाते. या सणासाठी जंगलातील उंच अशा सावरीच्या झाडाची निवड करून ती होळी वाजत-गाजत कोळीवाड्यात आणली जाते. मग तिला सजवून उभारणी करतात. ही होळी पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळते. या सणाची सध्या जोरदार तयारी सुरू असल्याचे पहावयास मिळत आहे.



# मराठीला ज्ञानभाषेत रूपांतरित करून पुढील पिढीपर्यंत नेऊया -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

जगामध्ये ज्ञानभाषा असलेल्या भाषाच पुढे प्रवाहित होत असल्याचा इतिहास आहे. ज्या भाषेतून व्यवहार चालतो, रोजगार मिळतो ती भाषा प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे आपल्या अभिजात मराठी भाषेला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध अशी मराठी भाषा आपण पुढील पिढीपर्यंत नेऊया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. ते विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शुक्रवारी (दि. २७) आयोजित जावे विनोदाच्या गावा या विशेष कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमास व्यासपीठावर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे, विधीमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळात मराठी भाषा शुद्ध होण्यासाठी शब्दकोश तयार केला. त्यावेळी प्रशासन चालविताना मराठीवर फारशी, अरबी या भाषांचे आक्रमण होते. त्यामुळे मराठी भाषेचे शुद्धीकरण करण्याचे कार्य शिवरायांनी केले. मराठी भाषेचा अभिमान हा सर्वप्रथम त्यांच्यापासून सुरू होतो. सुरुवातीच्या काळातील आद्य ग्रंथांमधून आपली मराठी भाषा किती अभिजात आहे, हे आपल्याला पहायला मिळते.

महाराष्ट्राच्या विधान मंडळात चालत असलेले कामकाज राजकीय क्षेत्र साहित्य निर्मिती करणारे आहे. या कामकाजामधूनच अनेक चित्रपट, नाट्य यांच्या कथानकांना विषय मिळत असतात. मराठीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिजात भाषेचा दर्जा देऊन राजाश्रय मिळवून दिला आहे. मराठी भाषा, आपल्या भाषेतील साहित्य आणि लोककला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

मराठी भाषेला समृद्ध करायचे असेल, पुढे न्यायचे असेल तर तंत्रज्ञान, संशोधने ही मराठी भाषेतूनच झाली पाहिजेत. तेव्हा मराठी ही ज्ञानभाषा होईल, असा विश्वास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केला.

मराठी माणसाच्या रक्तातच विनोद आहे. विनोद हा समाजामध्ये माणूस जोडणारा पूल आहे. त्यामुळे संकटातही जो विनोद शोधतो, तोच खरा मराठी माणूस आहे, अशा शब्दांत मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी माणसाचा गौरव केला.

तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना डिजिटल माध्यमांमध्ये मराठीचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे. प्रत्येक डिजिटल माध्यमांचा उपयोग करताना मराठीचा उपयोग करीत अधिक सक्षमपणे पुढील पिढीपर्यंत समृद्ध मराठीचा वारसा नेण्यात यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करीत मराठी साहित्याची महती विशद केली.

कार्यक्रमादरम्यान 'लोकसेवेचा लोकजागर' या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला मंत्री, राज्यमंत्री, विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य, विधिमंडळाचे कर्मचारी उपस्थित होते.

### जावे विनोदाच्या गावा विशेष कार्यक्रम

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित जावे विनोदाच्या गावा या विशेष कार्यक्रमामध्ये विनोदी कविता, विडंबन गीत, मराठी गीत सादर करण्यात आले. गायक श्रीरंग भावे आणि गायिका अदिती प्रभुदेसाई यांनी गीत सादर केले. लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी हे कविवर्य सुरेश भट यांनी लिहिलेले आणि कौशल इनामदार यांनी संगीतबद्ध केलेले मराठी अभिमान गीत सादर करण्यात आले. अभिनेते ऋषिकेश जोशी यांनी पु.ल. देशपांडे यांच्या विनोदी लेखाचे वाचन केले तसेच वि.दा करंदीकर लिखित 'साठीचा गजर' कविता सादर केली. 'जगी हा खास वेड्यांचा पसारा' जयवंत दळवी लिखित लेखाचे आणि मंगेश पाडगावकर लिखित कवितेचे वाचन दिग्दर्शक केदार शिंदे केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी आचार्य अत्रे आणि पु.ल. देशपांडे यांच्या जीवनकार्यांवर आधारित व्याख्यान दिले.

### राजिपसह जिल्ह्यातील पं.स.मध्ये संधी

# राज्य सरकारच्या निर्णयानुसार स्वीकृत सदस्य होणार नियुक्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सरकारच्या नव्या धोरणानुसार रायगड जिल्हा परिषदेत पाच जणांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी मिळणार आहे. दुसरीकडे पनवेल पंचायत समितीमध्ये तीन, तर उर्वरित पंचायत समित्यांमध्ये प्रत्येकी दोन स्वीकृत सदस्य असतील.

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्य नेमण्याच्या प्रस्तावाला गुरुवारी विधानभवनात पार पडलेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. सरकारच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के, तर पंचायत समित्यांमध्ये साधारण एकूण सदस्य संख्येच्या २० टक्के स्वीकृत सदस्य असतील. यात किमान दोन आणि कमाल चार स्वीकृत सदस्य असणार आहेत. रायगड जि.प.चे एकूण ५९ नवनिर्वाचित सदस्य आहेत. शासनाच्या धोरणानुसार इथे १० टक्के म्हणजे पाच ते सहा स्वीकृत सदस्य नेमता येणार आहेत.



पंचायत समित्यांच्या विचार केला, तर पनवेल पंचायत समितीमध्ये सर्वाधिक १६ सदस्य असल्याने तेथे तीन स्वीकृत सदस्य नेमले जाऊ शकतात. उर्वरित पंचायत समित्यांची सदस्य संख्या १२ आणि त्यापेक्षा कमी असल्याने तेथील स्वीकृत सदस्यांची संख्या दोन असेल.

बदललेले आरक्षण किंवा काही तांत्रिक कारणामुळे अभ्यासू कार्यकर्त्यांना निवडणूक लढवता आली नाही. काही कार्यकर्त्यांचा जनतेच्या दरबारात पराभव झाला, पण अनेक अभ्यासू, अनुभवी कार्यकर्त्यांची जिल्हा परिषद, पंचायत समितीसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये गरज असते. त्यांच्या कौशल्याचा उपयोग ग्रामीण विकासासाठी करून घेणे हा स्वीकृत सदस्य नेमण्यामागचा सरकारचा उद्देश आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समिती सभापतींची निवड झाल्यानंतर स्वीकृत सदस्य नियुक्त केले जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, शासनाचे धोरण जाहीर होताच अनेक कार्यकर्त्यांनी स्वीकृत सदस्य म्हणून वर्णी लागावी यासाठी पक्षश्रेष्ठींची मनधरणी करायला सुरुवात केली आहे.

# तळा शहरात शंकासूराची सलामी ठरतेय आकर्षण

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात दरवर्षी होळीच्या एक दिवस अगोदर खेडेगावातील नागरीक चाकरमानी होळी सणा निमित्त तळा शहरात विविध वस्तू खरेदीसाठी व विविध प्रकारची सोंगे घेऊन दुकानदार ते शहरातील अनेकांकडे जावून काही खेळ करतात व आनंद लुटत असतात.

धवचोल म्हणजे घरदार गाव स्वच्छ करुन तळा शहरात येऊन विविध वस्तू खरेदी करून दुसऱ्या दिवशी होळी उत्सव साजरा करतात ही एक पूर्वी पासून चालू असलेली परंपरा कायम आहे.त्यातून संस्कृतीचे एकात्मतेचे दर्शन घडत असते मात्र मोठ्या प्रमाणात वरळ, मजगाव , वाशीहवेली या विभागातून तमाशे येत असतात, ते पहाणे म्हणजे एक पर्वणी असते हे तमाशे लोप पावत असल्याच`चित्र पहावयास मिळत आहे

परंपरागत पध्दतीने होळीच्या आदल्या दिवशी शंकासूर म्हणून देवीचे दोन सेवक निवडले जातात त्यामध्ये एक जोगवाडीचा व एक तळेगावचा असतोया दोन्ही व्यक्ती शंकासुराचे कपडे वेगवेगळ्या पध्दतीने परिधान केलेले डोक्यावर पूर्ण त्याच पध्दतीची पूर्ण चेहरा बंद होईल अशी टोपी व पाठीमागे लांब शेपटी असा पेहराव केलेले हे शंकासूर असतात ही त्यांची वेशभूषा पाहून लहान मुले त्याला घाबरतात तसेच ते लहान मुलांसाठी वेगवेगळ्या पध्दतीने उड्या मारुन त्यांना हसवितात या दोन्ही शंकासूरांची भेट तळा शहरातील मोदी तलावावर होऊन दोघेही



मोठ्या आनंदाने सलामी देतात. व नंतर तेथून हे दोघे

ग्रामदेवता श्री चंडिकामातेच्या दर्शनासाठी मंदिरात जातात. याचा आनंद तळेकर नागरिक घेतात.तसेच या उत्सवात गावगावात निघणाऱ्या पालख्याही आनंदी वातावरणात काढल्या जातात.विविध आध्यात्मिक कार्यक्रम व स्पर्धाही घेतल्या जातात तसेच गायकीचे होणारे एकत्रित स्नेहभोजन(पोस्त) हे एकात्मतेचे गावागावांतील प्रतिक दिसून येत असते.व गावाच्या विकासावर ती चर्चा होऊन विकासालाही चालना मिळत असते.असे विविध कार्यक्रम होत असतात.होळीउत्सवात गावे फुल होऊन मोठ्या प्रमाणात चाकरमानी मंडळी होळी उत्सवासाठी येण्यास सुरुवात झाली आहे.

## सावधान! फेरीवाल्यांकडून कांदा खरेदी करताना काळजी घेण्याची गरज

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

सध्या श्रीवर्धन शहरात कांदा व लसूण विकणाऱ्या फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पुणे जिल्ह्यातून किंवा सातारा जिल्ह्यातून चार चाकी पिकअप किंवा टेम्पो घेऊन हे फेरीवाले कांदा व लसूण विक्रीसाठी श्रीवर्धन शहरात आणतात. बाजार भावा पेक्षा कमी भावाने हे लोक कांदा व लसणाची विक्री करतात. परंतु सदर फेरीवाल्यांकडून कांदे व लसूण खरेदी करताना नागरिकांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. बहुतांश फेरीवाले कांदा थेट गोणीच्या संख्येने विकत असतात.



अशा कांदा विक्रेत्यांकडून गोण खरेदी केली असता, गोणी मधील जवळजवळ अर्धे कांदे मोड आलेले, त्याचप्रमाणे खराब झालेले आढळुन येतात. जर गोण घ्यायची झालीच तर ती कोण संपूर्ण ओतून कांदा पाहून घ्या. हीच परिस्थिती लसुण विक्रेत्यांची आहे.

सदरची लसूण ही आत मध्ये पिकलेली व खराब झालेली असते. बाहेरून लसणाचा कांदा चांगला दिसत असला तरी आतील लसूण ही पिवळी पडलेली किंवा काळी पडलेली आढळुन येते. वजन मापामध्ये देखील घोटाळा करत असल्याचे दिसून येते.

# माथेरान जबरी चोरी प्रकरण उघड

## तिघांना अटक, साडेपाच लाखांचे सोने जप्त

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये वन ट्री हिल परिसरात घडलेल्या जबरी चोरी प्रकरणाचा छडा लावत माथेरान पोलिसांनी तिघांना अटक केली असून सुमारे ५ लाख ६२ हजार रुपयांचे सोने जप्त केले आहे.



ज्येष्ठ दाम्पत्याला चाकूचा धाक दाखवत बांधून ८ तोळे सोने व दीड लाख रुपयांची रोकड लंपास करण्यात आली होती.या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपी पुष्पेंद्र राम धुलारी (वय ३२),वकील उर्फ मोहम्मद मेवाती (वय २६),शिवम बलवीर सिंग (वय २०) असे नावे समोर आली.

१६ जानेवारी रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास चार दरोडेखोरांनी दुकानात खरेदीच्या बहाण्याने नारायण उर्फ अप्पा कदम यांच्या घरात प्रवेश केला. कदम दाम्पत्याला चाकूचा धाक दाखवत हात-पाय बांधून घरातील सोन्याचे दागिने व रोकड जबरदस्तीने लंपास करण्यात आली. चोरीनंतर आरोपींनी घराला बाहेरून कडी लावून घटनास्थळावरून पलायन केले.

या घटनेमुळे वन ट्री हिल परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेनंतर माथेरान पोलीस ठाण्याचे (तत्कालीन)अधिकारी अनिल सोनोने व त्यांच्या पोलिस पथकाने तातडीने तपास सुरू केला. यासाठी नेरळ पोलिस सहभाग घेण्यात आला होता. गोपनीय माहिती, तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज व स्थानिक माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढण्यात आला. त्यानुसार उत्तर प्रदेशातील तिघांना अटक करण्यात आली असून चौथ्या आरोपीचा माथेरान पोलिस शोध घेत आहेत.

## 'कोकण पर्यटन ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करा'

**मुंबई : प्रतिनिधी**

रत्नागिरी व सिंधुदुर्ग पर्यटनाचे अपार पाल आहेत. या सागरी देश विदेशात असतात. कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम अंतर्गत खेळ सुरू आहेत. या पर्यटन विकास दर्जादार स्वरूप कार्यक्रमासाठी अंतर्गत वातावरणासाठी उत्तम सुविधा निर्माण करा ,अशा सूचना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री योगेश कदम यांनी मंत्रालयात आयोजित कोकण ग्रामीण कार्यक्रमाच्या उत्साही कार्यक्रम आयोजित करा.

बैठक मंत्रालयात ग्रामीण विकास विभागाचे उपनियुक्त सुभाष इंग्लिश, चिपळूण सार्वजनिक विभागाचे संचालन अभियंता जगदीश सुखदेवे, जिल्हा परिषदेचे कार्यान्वित अभियंता हर्षल उपस्थित होते, तर दूरदृष्टी रत्नागिरी मनुज जिंदाल , जिल्हा निर्णयाचे मुख्य अधिकारी यांनी नमूद केले आहे.

कामाचे अधिकारी घेत असताना राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले , गावातील बचत गटांचा कोकण ग्रामीण विकास कार्यक्रम सहभागी यावा. बचतगटाच्या सूचनांचाही अंतर्भाव करण्यात आला. कर्दे ग्रामपंचायती हद्दीतील अधिकृत मान्यता स्वीकारली पूर्णपणे पूर्ण. या कामांसाठी निवडीला लढा विहित तंदुरुस्ती खर्च क्षमता. कामांच्या दर्जा तडजोड करत नाही.

कर्दे खाडीणे, खाडी येथे संरक्षक पूल बाधंणे तसेच कर्दे समुद्र किनालगत सांस्कृतिक संकुल या कामांसाठी सीआरझे परवानगी मिळाली आहे

# मुरूड आगारात सीएनजी गॅस पंप होणार नाही; सर्वेक्षणानंतर निर्णय



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड एसटी आगारात सीएनजी गॅस पंप उपलब्ध नसल्याने मुंबई -पुणे धावणाऱ्या एसटी बसेसना अलिबाग वा अन्यत्र गॅस भरावा लागतो परिणामी प्रवाशांचा खोळंबा होत असुन वेळेवर बसेस पोहचू न शकल्याने प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याची तक्रार आहे. मुरुड आगारात सीएन जी गॅस पंप कार्यान्वित व्हावा ही मागणी मुरुड तालुक्यातील लोकांची होती. यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी विशेष प्रयत्न केले होते.यासाठी गॅस कंपनी अधिकारी यांची बैठक लावून मुरुड आगाराला गॅस पंप देण्याचे आदेश त्यांनी निर्गमित केले होते.त्यांनी सांगितल्या प्रमाणे गॅस कंपनीचे अधिकारी सर्वेक्षण करून गेले.परंतु नकारात्मक अहवाल दिल्याने आता मुरुड येथे आगार मध्ये गॅस पंप होणार नाही हे आता उघड झाले आहे.

सीएनजी पंपाचा अभाव असल्याने मुरुड आगारातील एसटी बस सेवेच्या टाईम मॅनेजमेंट जुळवतांना मोठ्या अडचणींचा सामना करावालागत असल्याचे चित्र आहे . मुरुड आगारात आता पर्यंत ७ नवीन बस गाड्या सोडल्या तर उर्वरित ३० गाड्या ह्या सीएनजी वरच धावत असून गॅस भरण्यासाठी त्यांना अलिबाग येथे मोठा वेळ द्यावा लागत असल्याने प्रवाशांना ताटकळत बसावे लागत आहे.

मुरुडसारख्या महत्त्वाच्या पर्यटनस्थळी सीएनजी गॅस पंप तातडीने सुरु करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू पहात आहे. जिल्हयात माणगाव , श्रीवर्धन सारख्या ठिकाणी गॅस पंप सहजी मंजुर केला जातो आणि मुरुड मध्ये नकार का दिला जात आहे असा सवाल असंख्य प्रवासी वर्ग विचारत आहेत.

या संदर्भात पेण येथील विभाग नियंत्रक चौरे यांच्याशी दूरध्वती वरून संपर्क साधला असता ते म्हणाले की , महानगर गॅस कंपनीकडे मुरुड आगाराचा सीएन जी गॅस पंपाचा प्रस्ताव पाठवला होता परंतु मुरुडला सीएन जी पंप देतांना ३० गाड्यां साठी पंप देता येत नसल्याचे कारण सांगुन महानगर कडून हा प्रस्ताव नांमजूर करण्यात आल्याचे सांगितले.

मुरुड तालुक्यात गॅस भरण्यासाठी फक्त मुरुड आगारातील गाड्या नसून असंख्य खाजगी गाड्या सुधा आहेत. याचा महानगर गॅस कंपनीने विचार करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी प्रवासी वर्गांनी केले आहे.

## सिडकोचे घर-माझा फर्स्ट चॉइस योजनेत पर्याय निवडीसाठी मुदतवाढ



**नवी मुंबई : सिडको वृत्त**

सिडको महामंडळातर्फे राबविण्यात येत असलेल्या १६,८७६ सदनिकांच्या माझे पसंतीचे सिडकोचे घर - माझा फर्स्ट चॉइस नवी मुंबईमध्ये गृहनिर्माण योजनेत पर्याय निवडीसाठी दि. १९ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. योजनेस नागरिकांकडून मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाचा विचार करून तसेच अधिकाधिक सर्वसामान्य नागरिकांना हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

माझे पसंतीचे सिडकोचे घर - माझा फर्स्ट चॉइस नवी मुंबईमध्ये या योजनेंतर्गत नवी मुंबईतील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली या नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट यांच्यासाठी १६,८७६ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या योजनेत अनामत रक्कमेचा भरणा करण्यासाठीची अंतिम तारीख १५ मार्च २०२६ तर आपले पसंतीचे पर्याय निवडण्यासाठीची अंतिम तारीख १९ मार्च २०२६ आहे. अधिकाधिक नागरिकांनी दिलेल्या मुदतवाढीचा लाभ घेऊन योजनेसाठी अर्ज करावा आणि नवी मुंबईतील आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करावे, असे सिडकोतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## 'हिंद दी चादर' गुरू तेग बहादूर यांचा ३५०वा शहिदी समागम

देशासाठी बलिदान देणाऱ्यांची गाथा समाज आणि युवा पिढीला ज्ञात झाली पाहिजे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धोरण आहे. देशप्रेम कायम जागरूक ठेवण्याचे काम मोदीजी करत असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष लक्ष दिले आहे, तर आमदार प्रशांत ठाकूर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यरत आहेत, असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी नमूद केले. त्याचप्रमाणे सर्व समाजाचे नेते, प्रतिनिधी, विविध संस्था-संघटना आणि शासकीय अधिकारी, पदाधिकारी काम करत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमाच्या भव्य दिव्य आयोजनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सरकारचे आभार व्यक्त केले. इ.स. १६७५मध्ये औरंगजेबाच्या काळात काश्मिरी पंडितांवर जबरदस्तीने धर्मांतर करण्याचा दबाव टाकण्यात आला. त्यांच्या संरक्षणासाठी गुरू तेग बहादुर यांनी स्वतः पुढाकार घेतला व त्यांनी देशासाठी बलिदान दिले. त्यांच्या महान बलिदानामुळे त्यांना हिंद दी चादर असे म्हटले जाते. त्यामुळे देशासाठी बलिदान देणारे गुरू तेग बहादुर यांचे या कार्यक्रमातून कायम स्मरण होत राहणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी होण्याच्या दृष्टिकोनातून आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत, अशी माहितीही त्यांनी दिली.

## वाजे आणि गाढेश्वर येथे विकासकामांचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूरयांच्या नेतृत्वाखाली विधानसभा मतदारसंघात विकासाचा झंझावात सुरू असून, तालुक्यातील ग्रामीण भागाचा कायापालट करण्यावर त्यांनी भर दिला आहे. या अंतर्गत तालुक्यातील वाजे येथे १० लाख रुपयांच्या निधीमधून अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण आणि गाढेश्वर येथे १० लाख रुपयांच्या निधीमधून समाज मंदिर बांधण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन भारतीय जनतापार्टीचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी उत्साहात पार पडले.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या प्रयत३नामुळे आणि निधीतून ही कामे मार्गीलागत असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. वाजे येथीलरस्त्याच्या कॉंक्रिटीकरणामुळे दळणवळण सुलभ होणार असून गाढेश्वर येथीलसमाज मंदिरामुळे ग्रामस्थांना सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी हक्काचीजागा उपलब्ध होणार आहे.

या सोहळ्याप्रसंगी भाजप नेते संजय पाटील, पनवेलपंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, नेरे विभागीय अध्यक्ष राजेश भोईर, शामभालेकर, राजेश भालकेर, राघो पाटील, गणेश पाटील, रेवन पाटील, पदु वाघ,मदन पाटील, रुपेश भोईर, किशोर पाटील, सिताराम जळे, परशुराम जळे, चंदरडुकरे, यशवंत पाटील, प्रधान पाटील, उमा पाटील, अंजना पाटील, देवाळी पाटील,श्रुती पाटील, राधा पाटील, जणाबाई डुकरे, संगीता मसणे यांसह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## देवद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे संदीप वाघमारे बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील देवद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक शुक्रवारी झाली. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे संदीप वाघमारे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली. याबद्दल त्यांचे भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठभगत यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी पनवेल पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, नीलम भिंगारकर,जिल्हा सरचिटणीस यतीन पाटील, युवामोर्च्याचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षआनंद ढवळे,सरपंच विनोद वाघमारे, माजी सरपंच बाळाराम पाटील, तेजस्विनीवाघमारे, माजी उपसरपंच साधना वाघमारे, दिनेश वाघमारे, कृष्णा वाघमारे,करुणा वाघमारे, मानसी वाघमारे, संदीप वाघमारे, प्रभाकर सोनावणे, आकांशारसाळ यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ‘हिंद-दी-चादर’बद्दल जनजागृती कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फेहिंद-दी-चादर या संकल्पनेवर आधारित विशेष जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाच्या निमित्ताने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

महाराष्ट्र राज्यस्तरीय हा भव्य कार्यक्रम २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी ओवेपीठ मैदान येथे संपन्न होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये त्यांच्या महान जीवनकार्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी महाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात आले. श्री गुरु



तेग बहादुर साहिब जी यांना हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जाते, कारण त्यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवतेच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या शौर्य, त्याग आणि अध्यात्मिक विचारांचा संदेश तरुण पिढीपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने सामूहिक गायन घेतले व डॉक्युमेंटरी विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली.

महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना सामाजिक एकता, सहिष्णुता आणि राष्ट्रप्रेम यांचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी आयोजकांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

आगामी शहीदी समागम कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील तर सर्व शिक्षक व शिक्षकेतर, कर्मचारी राष्ट्रीय स्वयंसेवक यांनी सहकार्य केले.

## रोटरी क्लबतर्फे आरोग्य जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

’खारघर रोटरी क्लब’तर्फे स्त्री आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने खारघर, सेक्टर-१९ मधील मुर्बी गांव येथील न्यू इंग्लिश स्कुलमध्ये विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेतील सुमारे १५० विद्याथिनींना सॅनिटरी नॅपकिनचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी शाळेतील शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमादरम्यान खारघर येथील स्त्रीरोग तज्ञ डॉ. क्रांती फडणीस यांनी विद्यार्थिनींना आरोग्य, योग्य आहार, वैयक्तिक स्वच्छताआणि मासिक पाळीतील काळजी याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागरुकता निर्माण झाली. या प्रसंगी ’रोटरी क्लब’च्या वतीने डॉ. कोमल गुंडेवार, शाम फडणीस, अनामिका, भरत जैन, मेधा फडणीस उपस्थित होते.

## पनवेलसह खारघर नोडमधील अनधिकृत बांधकामांवर सिडकोची धडक कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

सिडकोच्या अनधिकृत बांधकामे नवी मुंबई विभागाने गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत बांधकामांवर कारवाईचा सपाटा लावला आहे. त्यानुसार या विभागाने खारघर नोडसह पनवेल नोड येथे निष्कासन मोहिम राबवून सिडको अधिसूचित जागेवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करून ती हटविली. यात झोपड्यांसह भंगारगोडाऊन फूटपाथवरील स्टॉल व बांबू शेड यांच्यावर तोडक कारवाई करण्यात आली.

या कारवाईसाठी, सिडको पोलिस अधिकारी १, कर्मचारी १०, स्थानिक पोलिस स्टेशन- २ कर्मचारी, सिडको सेक्युरीटी १०, १०, ०१ जेसीबी, ट्रक- १ जीप ३१ टेम्पो दूहलर, कामगार-०८ असा लवाजमा तैनात ठेवण्यात आला होता. सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागाने खारघर नोडमध्ये निष्कासन मोहिम राबवून सिडको अधिसूचित जागेवरील अनधिकृत बांधकामे हटविली. यात प्रामुख्याने सेक्टर १०, मधील फूटपाथवरील ०६ स्टॉल व बांबू शेडच्या ०२ झोपड्यांवर कारवाई केली. सेक्टर १४ येथील फुटपाथ व मोकळ्या भूखंडावरील १९ झोपड्या, से ११ येथील फुटपाथ व मोकळ्या भूखंडावरील २१ झोपड्या आणि ३ स्टॉल, सेक्टर २० येथील फुटपाथवरील ०६ स्टॉलवर कारवाई केली.

या कारवाईसाठी, सिडको पोलिस अधिकारी, कर्मचारी, स्थानिक पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी, सिडको सेक्युरीटी कामगार तैनात होते. कारवाई केलेली नमूद अतिक्रमणे सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करुन तसेच सिडको महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली असल्यामुळे ती निष्कासित करण्यात आल्याची माहिती सिडकोने दिली. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निदेशानुसार व मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आली.

## सीकेटी विद्यालयात महाराष्ट्रातील बोलीभाषांप्रति समर्पित उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागात गुरूवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मराठी राजभाषा गौरव दिवस मोठ्याा उत्साहात साजरा करण्यात आला.

राजभाषा दिनाच्या या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सौ. संजना संजय भोईर नीलिमा शिंदे मॅडम मुख्याध्यापिका इंग्रजी प्राथमिक विभाग, वैशाली पारधी पर्यवेक्षिका इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग, संतोष चव्हाण,मुख्याध्यापक इंग्रजी माध्यमिक विभाग , पर्यवेक्षिका निरजा अदुरी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलाने व कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते करून झाली. सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ‘ ग्रंथदिंडी‘. प्रमुख पाहुणे संजना संजय भोईर व मुख्याध्यापक चव्हाण यांच्या हस्ते ग्रंथदिंडी काढण्यात आली.

भगवंत विठ्ठलाचे नामस्मरण करत, टाळ मृदुंगाच्या गजरात इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठमोळ्या या खास वेशभूषेतून ग्रंथदिंडी पूर्ण शाळेच्या आवारात फिरवण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रकाश पांढरे यांनी केले .सर्व मान्यवरांचे स्वागत पर्यवेक्षिका निरजा मॅडम यांनी केले. विद्यार्थ्यांनी कविता व भाषणे प्रस्तुत करून मराठी भाषेविषयीची आपली आवड जपली. निधी पाटील ,रिषभ देशमुख,तनिषा गावडे यांनी मराठी भाषणे सादर केली.



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व मराठी भाषेविषयी आवड निर्माण होण्यासाठी आमच्या विद्यालयात अनेक उपक्रम ,स्पर्धा व बाह्य परीक्षा घेण्यात येतात.

सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान ‘मराठी बोली भाषांप्रति समर्पित ’ नावाचे नाटक इ. आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरित्या सादर केले. नाटका च्या संपूर्ण तयारीसाठी प्रगती जाधव यांनी मार्गदर्शन केले होते. तसेच इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी महाराष्ट्रातील बोली भाषांवर आधारित सुंदर नृत्याचे सादरीकरण केले. प्रमुख पाहुणे संजना भोईर यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषेचा विकास, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्यांचा इतिहास, तसेच ’कुसुमाग्रज’ शब्दाचा इतिहास उलगडला व विद्यार्थ्यांनी यश संपादन करण्यासाठी कोणत्या सकारात्मक बाबींचे अवलोकन करावे अशा त्रिवेणी विषयावर प्रकाश टाकला आणि मी रोजच्या व्यवहारात मराठी भाषेचा वापर करेनच पण विद्यार्थ्यांनीही करावा असे अवाहन केले.

मायबोली मराठी आपल्यासाठी केवळ एक भाषा नसून ममतेचे, वात्सल्याचे आणि संस्कारांचे बोल आहेत. जागतिकी करण्याच्या या स्पर्धेत आपण आपली भाषा विसरू नये अशी इच्छा व्यक्त करत मुख्याध्यापक चव्हाण सरांनी आपले विचार मांडले

## पर्यावरणपूरक आणि वृक्षमैत्री होळी साजरी करण्याचे ‘फ्रेंड्स ऑफ नेचर’तर्फे आवाहन

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यात पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या फ्रेंड्स ऑफ नेचर, सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था,चिरनेर-उरण संस्थेच्या वतीने नागरिकांना यावर्षी होळी सण पर्यावरणपूरक व वृक्षमैत्री ने साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




संस्थेने प्रसिद्ध केलेल्या जनजागृती संदेशात नमूद करण्यात आले आहे की, होळी हा आनंद, एकात्मता आणि निसर्गाशी नाते दृढ करणारा सण असला तरी सण साजरा करताना झाडांची तोड, रासायनिक रंगांचा वापर आणि पाण्याची उधळपट्टी यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे सण साजरा करताना पर्यावरण, झाडे व पक्ष्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

संस्थेने जिवंत झाडांची तोड न करण्याचे आवाहन केले आहे. होळी पेटवताना वाळलेल्या काटक्या, शेणकांड्या व नैसर्गिक वस्तूंचाच वापर करावा. तसेच एक गाव - एक होळी या संकल्पनेतून सामूहिक होळी साजरी करून लाकडांची नासाडी टाळावी, पूर्वीचे व आताचे पप्रदूषणाची भीषणता पाहता वृक्षतोड थांबवून प्रतिकात्मक होळी त्याच उत्साहाने साजरी करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

रासायनिक रंग टाळून फुलांपासून तयार केलेले नैसर्गिक रंग वापरावेत, पाण्याची उधळपट्टी टाळून कोरडी होळी खेळावी, तसेच पक्षी, प्राणी व वृक्षांवर रंग टाकू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.होळीनंतर प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा. होळीची राख सेंद्रिय खत म्हणून वापरावी. परिसर स्वच्छ ठेवून प्लास्टिकमुक्त सण साजरा करण्यावरही भर देण्यात आला आहे.संस्थेने प्रसिद्ध केलेल्या जनजागृती संदेशात नमूद करण्यात आले आहे की, होळी हा आनंद, एकात्मता आणि निसर्गाशी नाते दृढ करणारा सण असला तरी सण साजरा करताना झाडांची तोड,रासायनिक रंगांचा वापर आणि पाण्याची नाहक उधळपट्टी यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे सण साजरा करताना पर्यावरणाचे संरक्षण करणे ही सामूहिक जबाबदारी असल्याने जिवंत झाडांची तोड न करण्याचे आवाहन केले आहे.



**पनवेल : श्री गुरू तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५०व्या हुतात्मा संमेलनानिमित्त खारघर येथे भव्य हिंद-दी-चादर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात आली असून भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी खारघरमधील नियोजित कार्यक्रमस्थळाला भेट देऊन कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. हा सोहळा अत्यंत भव्य दिव्य स्वरूपात पार पडणार असून त्यादृष्टीने मंडप उभारणी, येणाऱ्या भाविकांची आसनव्यवस्था आणि इतर तांत्रिक बाबींचा आढावा यावेळी घेण्यात आला. या वेळी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, पनवेल उत्तर मंडळ सरचिटणीस विनोद घरत, युवा मोर्चा जिल्हा सचिव शुभ पाटील आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# नामबदलावरून कांगावा

केरळ विधानसभेच्या दोन वर्षे प्रलंबित असलेल्या ठरावानुसार केरळचे नामकरण करण्यास मोदी सरकारने मान्यता दिली, तरीही पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्याचा संबंध केरळमधील आगामी विधानसभा निवडणुकांशी जोडला. ममता बॅनर्जी केंद्राच्या नावाने ओरड करण्याची संधीच शोधत असतात. त्यामुळे त्यांनी केरळमधील निवडणुकांच्या तोंडावर केंद्रातील भाजप सरकार आणि केरळमधील सत्ताधारी डाव्या आघाडीत छुपा समझोता झाल्याचा आरोप केला. वास्तविक केरळ विधानसभेने केरळ राज्याचे केरळम असे नामकरण करण्याचा ठराव यापूर्वी दोनदा मंजूर करून केंद्र सरकारकडे पाठवला होता.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत अलीकडेच केरळ राज्याचे नाव बदलून 'केरळम' करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. त्यानंतर केरळच्या या मूळ नावाला अधिकृत मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू झाली. वास्तविक केरळ विधानसभेने 'केरळम' असे नामकरण करण्याचा ठराव यापूर्वी लागोपाठ दोनदा मंजूर करून केंद्र सरकारकडे पाठवला होता. तरीही, केंद्राने 'केरळम'ला सहमती दर्शवली पण 'बांगला' नावाला सहमती दिली नाही अशी आगपाखड ममता बॅनर्जींनी सुरू केली. वास्तविक मल्याळममध्ये केरळला 'केरळम' असेच म्हटले जाते. स्वातंत्र्यलढ्याच्या काळापासून मल्याळम भाषिक लोकांसाठी एकसंघ केरळ राज्याची मागणी होत होती. त्यानुसार १ नोव्हेंबर १९५६ रोजी केरळ राज्याची निर्मिती झाली. तेथील डाव्या आघाडी सरकारने प्रथम २०२३ मध्ये केरळचे 'केरळम' असे नामकरण करण्याचा ठराव केला होता. पण त्यात काही तांत्रिक त्रुटी असल्याने त्या दूर करण्यास केंद्र सरकारने त्यांना सांगितले. त्यानुसार २४ जून २०२४ रोजी केरळ विधानसभेने राज्याचे नाव इंग्लिशमधील 'केरला' ऐवजी 'केरळम' करण्याचा ठराव पुन्हा मंजूर केला. हे सारे राज्याचे नाव बदलण्यासाठीच्या सुनिश्चित प्रक्रियेनुसारच आहे. राज्याच्या विधानसभेने बहुमताने नामबदलाचा ठराव मंजूर केल्यानंतर हा ठराव केंद्रीय गृह मंत्रालयाकडे सादर करावा लागतो. गृह मंत्रालय केंद्राच्या विविध विभागांकडून त्यासाठी 'ना हरकत' मागते. त्यानंतर हा प्रस्ताव राष्ट्रपतींकडे पाठवला जातो. राष्ट्रपतींनी संसदेला शिफारस केल्यानंतर लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये साध्या बहुमताने नामकरणाचा ठराव मंजूर व्हावा लागतो. संसदेने मंजूर केलेला प्रस्ताव नेहमीप्रमाणे पुन्हा राष्ट्रपतींकडे जातो. राष्ट्रपतींची त्यावर स्वाक्षरी झाल्यावर त्याचे कायद्यात रूपांतर होते व राज्याचे नाव अधिकृतपणे बदलले जाते. अलीकडच्या काळात ओरिसाचे ओडिशा, पॉण्डेचरीचे पुदुचेरी आदी बदल झाले आहेत. पश्चिम बंगालचे नाव बदलून 'बंगाल' किंवा बंगाली भाषेनुसार 'बांगला' करण्याचा ठराव पश्चिम बंगाल विधानसभेने २०१८ मध्ये मंजूर करून पाठवला आहे. या ठरावाला सात वर्षे उलटली तरी केंद्र सरकारने त्यास सहमती दर्शवलेली नाही यावरून ममता दीदींनी यावेळी बरीच ओरड केली. जेव्हा आमचे सरकार केंद्रात येईल तेव्हा आम्ही पश्चिम बंगालचे 'बांगला' करू आदी विधानेही त्यांनी केली. मात्र आपल्या या नामबदलाच्या मागणीची त्यांनी कुठलीही तर्कसुसंगत मांडणी केली नाही. वास्तविक पश्चिम बंगाल या नावामुळे शेजारचा बांगलादेश हा आधी पूर्व बंगाल होता हा इतिहास स्मरणात राहतो. खेरीज या राज्याचे नावही बदलून बांगला झाल्यास बांगला व बांगलादेश यात गल्लत, गोंधळ होऊ शकतो. पण इतका सारासार विचार करण्याची अपेक्षा ममता बॅनर्जी यांच्याकडून करता येत नाही.**

# राष्ट्रीय विज्ञान दिनाचा इतिहास

आज 'राष्ट्रीय विज्ञान दिन'. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी भारतीय भौतिकवादी सर चंद्रशेखर वेंकट रामन यांनी भारतातील 'रामन इफेक्ट'चा शोध लावला. तेव्हापासून २८ फेब्रुवारी हा दिवस भारतामध्ये 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी 'राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषद' आणि 'विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या' अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो.

रामन इफेक्टचा शोध लागल्याने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या शोधाची घोषणा भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकटरामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी केली होती. या शोधाबद्दल त्यांना १९३०मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले होते.

भारतात १९८६पासून दरवर्षी २८ फेब्रुवारी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. भौतिकशास्त्रातील आपल्या संशोधनामध्ये त्यांना रामन इफेक्टचा शोध लावला. याच संशोधनातून पुढे रामन स्कॅटरींगचा शोध लागला. जेव्हा एखादा प्रकाशाचा किरण धूळ कण विरहीत, पारदर्शक रासायनिक संयोगातून जातो त्यावेळी त्यातील प्रकाशाचा काही अंश येणाऱ्या किरणांच्या विरुद्ध दिशेला तयार होतो. हे पसरलेले प्रकाशाचे किरण एकाच तरंगाचे असतात, मात्र काही प्रकाश किरण हे सोडण्यात आलेल्या प्रकाशाच्या किरणांहून वेगळ्या तरंगाचे असतात यालाच 'रामन इफेक्ट' म्हणतात. या शोधासाठी त्यांना



नोबेल व्यतिरिक्त १९५४मध्ये सर्वोच्च भारतीय पुरस्कार 'भारतरत्न'ने गौरवण्यात आलं.

विज्ञानात रुची वाढवण्यासाठी आणि समाजात विज्ञानाविषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा केला जातो. 'राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषद' आणि 'विज्ञान आणि तंत्रज्ञान' मंत्रालयाकडून या दिवशी देशभरात अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे देशातील विज्ञानाची निरंतर प्रगती कायम ठेवणे. यासह, देशात अणुऊर्जेविषयी असलेली लोकांच्या मनातील भीती दूर करणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. केवळ अणुऊर्जेने देशाचा अथक विकास सुनिश्चित केला जाऊ शकतो. समाजातील लोकांचे जीवनमान उंचावेल आणि विकसित होऊ शकेल, हे उदिष्ट असते.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त बहुतेक शाळा, महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्थांमध्ये विज्ञानासंबंधित अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. याशिवाय विज्ञान संस्था, विज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान अकादमींमध्ये अनेक वैज्ञानिक कार्यक्रम आयोजित केले जातात.



या दिवशी भाषण, निबंध, लेखन, विज्ञान प्रश्नोत्तरी, विज्ञान प्रदर्शन, चर्चासत्र आणि चर्चासत्राचे आयोजनदेखील केले जाते.

याच्या काळाला विज्ञानाचं आणि माहिती तंत्रज्ञानाचं युग म्हटलं जातं. आपल्या देशानेसुद्धा विज्ञानाच्या आधारे विविध क्षेत्रात आमूलाग्र प्रगती केली आहे. देशातील नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या मनावर विज्ञानाचं महत्त्व बिंबवलं जावं यासाठी दरवर्षी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा केला जातो. भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो.

हा दिवस भारतीय शास्त्रज्ञ सर सी.व्ही. रामन यांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी 'रामन इफेक्ट'चा शोध लावला होता. रामन इफेक्टसाठी त्यांना १९३०मध्ये भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळालं होतं. १९८६ मध्ये पहिल्यांदा राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला होता. नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशनने भारत सरकारकडे मागणी केली होती की, २८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जावा.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील भारताच्या कामगिरीवर प्रकाश टाकणं आणि ती जगासमोर मांडणं हा राष्ट्रीय विज्ञान दिनाचा उद्देश आहे. या दिनानिमित्त तरुणांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरित केलं जातं. या शिवाय वैज्ञानिक विचार आणि तर्कशुद्ध दृष्टिकोन समाजात रुजवण्यासाठी प्रयत्न केले जातात. जेणेकरुन येणाऱ्या पिढ्यांना विज्ञानक्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा मिळेल आणि ते या क्षेत्रात आपलं भविष्य घडवू शकतील. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचं महत्त्व लक्षात आणून देण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिन हा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. हा दिवस आपल्याला विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील भारताच्या कामगिरीबद्दल अभिमान बाळगण्याची संधी देतो.

'विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान' ही या वर्षीच्या विज्ञान दिनाची थीम आहे. ही थीम विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला स्वावलंबी बनवण्याचं महत्त्व अधोरेखित करते आणि स्वदेशी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर भर देते.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त देशभरातील शाळा आणि कॉलेजेसमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केलं जातं. वैज्ञानिक प्रदर्शनं आणि परिषदा होतात. या शिवाय विज्ञान विषयावर निबंध व वक्तृत्व स्पर्धाही आयोजित केल्या जातात. काही ठिकाणी विज्ञानाशी संबंधित चित्रपट दाखवले जातात. विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी शाळा आणि कॉलेजेसमध्ये वैज्ञानिक कार्यशाळादेखील घेतल्या जातात. (साभार : इंटरनेट)

# प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ सी.व्ही. रमन

सी.व्ही. रमन हे एक प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ होते ज्यांनी रमन इफेक्टचा शोध लावला होता, ज्यामध्ये रेणूंद्वारे विखुरल्यावर प्रकाशाची वारंवारता कशी बदलते हे स्पष्ट केले आहे. सी.व्ही. रमन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी तामिळनाडूतील तिरुचिरापल्ली येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना शिक्षणात खूप रस होता आणि त्यांचे वडील, भौतिकशास्त्र आणि गणिताचे व्याख्याते होते, त्यांनी त्यांची उत्सुकता वाढवण्यात मोठी भूमिका बजावली. रमन यांनी मद्रासमधील प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये शिक्षण घेतले, पुढील अभ्यासासाठी त्यांचे लक्ष भौतिकशास्त्राकडे वळले.

त्यांना संगीताची आवड होती आणि त्यांनी पारंपारिक भारतीय वाद्यांचे ध्वनिकी अभ्यासले. १९२९मध्ये विज्ञानातील योगदानाबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना नाइट ही पदवी दिली. २१ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन होईपर्यंत त्यांनी त्यांचे संशोधन



आणि शैक्षणिक कार्य चालू ठेवले. २८ फेब्रुवारीला त्यांनी लावलेल्या शोधामुळे भारत सरकारने १९८६मध्ये तो दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन घोषित केला दरवर्षी तो साजरा केला जातो

सी.व्ही. रमन यांनी भौतिकशास्त्राच्या क्षेत्रात, विशेषतः प्रकाशाच्या अभ्यासात मोठी प्रगती केली. १९२८मध्ये त्यांनी एक अभूतपूर्व शोध लावला, ज्याला आता रमन इफेक्ट म्हणून ओळखले जाते. या परिणामामुळे प्रकाश एखाद्या पदार्थातून जातो तेव्हा त्याची तरंगलांबी कशी बदलते हे दिसून आले. त्यांचा शोध क्रांतिकारी होता आणि त्याने प्रकाश आणि स्पेक्ट्रोस्कोपीच्या अभ्यासात नवीन मार्ग उघडले.

१९३०मध्ये सी.व्ही. रमन हे रमन इफेक्टवरील त्यांच्या कामासाठी भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक जिंकणारे पहिले आशियाई बनले. या शोधामुळे त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आणि प्रकाश वेगवेगळ्या पदार्थांशी कसा संवाद साधतो याची समज मोठ्या प्रमाणात वाढली. (साभार : इंटरनेट)




# सावध व्हा! ही चूक केली तर फ्रिजचा होऊ शकतो ब्लास्ट

उकाडा वाढू लागला आहे, अनेकजण घरातील एसी साफ करून घेत असतील. एसी नीट साफ केला नाही तर



त्याच्या कुलिंगवर परिणाम होतो, मग लाईट बिलही जास्त येते. परंतू, तुमच्या घरातील फ्रिजचे काय? आजकाल प्रत्येक घरात फ्रिज आहे. कोणाकडे सिंगल डोअर, कोणाकडे डबल डोअर आहे. या फ्रिजचेही वातावरणानुसार सेटिंग करावे लागते, नाहीतर स्फोट झाला म्हणून समजा...

एसीसारखाच फ्रिजसाठीही थोडे लक्ष द्यावे लागेल, नाहीतर मीटर धावत सुटेल आणि बिल येईल. याहून धोकादायक जर बाहेरच्या तापमानाप्रमाणे आतील तापमान ठेवले नाही तर एसीचा कॉम्प्रेसर सुरु राहून तुम्हाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. अनेकदा फ्रिजचा स्फोट झाल्याचे ऐकले असेल.

अनेकांच्या फ्रिजमध्ये फ्रिजरचे आणि फ्रिजचे वेगवेगळे सेटिंग असते. अनेकांना आपला फ्रिज कोणत्या नंबरवर ठेवावा हे माहिती नसते. उन्हाळ्यात, हिवाळ्यासाठी आणि पावसाळ्यासाठी वेगवेगळे तापमान असते. उन्हाळ्यात खाद्यपदार्थ लवकर खराब होतात, यामुळे उकाड्याची झळ त्यांच्यापर्यंत पोहोचू नये म्हणून फ्रिजचा कॉम्प्रेसर सतत काम करत असतो. तापमान वाढवून ठेवले तर कॉम्प्रेसरला सतत काम करावे लागते. यामुळे स्फोट होऊ शकतो.


उन्हाळ्यात फ्रिज ३ ते ४ नंबरवर ठेवावा. जेणेकरून खूप जास्त थंड नाही, खूप कमी थंड नाही असे वातावरण तयार राहते. थंडीमध्ये फ्रिजचे सेटिंग १ नंबरवर ठेवावे. थंडीच्या काळात अनेकजण फ्रिज बंद मध्ये मध्ये करून ठेवतात. जे चुकीचे आहे. तसेच बराच काळ फ्रिज बंद केला तर त्याचा कॉम्प्रेसर जाम होऊ शकतो आणि चालू करताच तापून बिघडू शकतो.

फ्रिजची दुरुस्ती करताना अनेकदा पैसे वाचतात म्हणून किंवा दुरुस्त करणारा लोकल पार्ट वापरतो. यामुळे स्फोट होऊ शकतो. कॉम्प्रेसरची कंपनीच्या माणसाकडूनच दुरुस्ती करून घ्यावी आणि ओरिजिनल पार्ट वापरावेत. यामुळे फ्रिजच्या नादुरुस्तीकडे दुर्लक्ष करू नका.

# भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद

डॉ. राजेंद्र प्रसाद यांचा आज स्मृतिदिन. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ते एक थोर नेते आणि भारताचे पहिले राष्ट्रपती होते. त्यांचा जन्म ३ डिसेंबर १८८४ रोजी बिहारमधील जीरादेई या ठिकाणी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मौलवींतर्फे घरीच पारंपरिक पद्धतीने झाले. त्यात उर्दू आणि फार्सी या भाषाशिक्षणावर अधिक भर होता. पुढे छपरा, हथवा व पाटणा या ठिकाणी शालेय शिक्षण घेऊन त्यांनी कोलकात्यातील प्रेसिडेन्सी महाविद्यालयांतून बीए (१९०६), एमए (१९०८), बीएल (१९०९) व एमएल (१९१५) या पदव्या मिळविल्या.

सुरुवातीस काही वर्षे त्यांनी अध्यापनाचे काम केले आणि नंतर कोलकाता उच्च न्यायालयात वकिलीस प्रारंभ केला (१९११). काँग्रेसच्या कोलकाता अधिवेशनात स्वयंसेवक म्हणून त्यांनी काम केले (१९०६). पाटणा नगरपरिषदेचे ते अध्यक्षही होते. ते पुढे १९११ मध्ये काँग्रेसचे सभासद झाले. बिहारच्या १९१७ च्या चंपारण्य सत्याग्रहाच्या वेळी महात्मा गांधींशी त्यांचा परिचय वाढला. त्यांनी महात्मा गांधींच्या चतुःसूत्रीचा पुरस्कार केला आणि वकिली व्यवसाय सोडला. पाटण्यात त्यांनी राष्ट्रीय विद्यापीठ स्थापून स्वदेशी, मद्यपानबंदी, खादीचा प्रसार इत्यादी कार्यक्रम हाती घेतले. बिहारमध्ये १९३४ साली फार मोठा भूकंप झाला. मदत समितीचे अध्यक्ष



## निमित्त

या नात्याने त्यांनी अतोनात परिश्रम घेऊन ३८ लाख रुपयांचा भूकंप निधी जमा केला. प्रकृतीची पर्वा न करता त्यांनी रात्रंदिवस गोरगरिबांसाठी काम केले.

राजेंद्रबाबूंच्या अध्ययनाचा प्रारंभ ऊर्दू आणि फार्सी भाषांनी झाला असला, तरी नंतर त्यांनी इंग्रजी हिंदी व बंगाली या भाषांवर प्रभुत्व मिळविले. हिंदु कायद्याचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी संस्कृत भाषेचा अभ्यास केला. हिंदीचा भारतभर व विशेषतः दक्षिण भारतात प्रसार व्हावा, म्हणून ते प्रयत्नशील होते. १९१२च्या हिंदी साहित्य संमेलनाचे ते चिटणीस होते. नागपूर येथील अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांना लाभले (१९३६). त्यांचे लेखन हिंदी व इंग्रजीत आहे. बापू के कदमोंमें (१९५०), साहित्य, शिक्षा, और संस्कृती (१९५२), भारतीय शिक्षा (१९५३), चंपारणमें महात्मा गांधी (१९१८), मेरे युरोप के अनुभव व आत्मकथा (१९४७) हे त्यांचे हिंदी ग्रंथ प्रसिद्ध आहेत. इकॉनॉमिक्स ऑफ खादी (१९२६) आणि डिव्हायडेड इंडिया (१९४६) ही त्यांची इंग्रजी पुस्तके. साधी, सरळ, ओघवती भाषाशैली आणि सुस्पष्ट मांडणी हे त्यांचे लेखन विशेष होत. यांव्यतिरिक्त त्यांनी वृत्तपत्रातुन स्फुटलेखनही केले. सर्च लाईट या पाटण्याच्या इंग्रजी दैनिकाचे ते संस्थापक होते. येथील लॉ विकली या साप्ताहिकाशीही त्यांचा संबंध होता. त्यानंतर त्यांनी देश नावाचे हिंदी नावाचे साप्ताहिक चालू केले (१९२०).

राजेंद्रबाबूंना अनेक मान-सन्मान मिळाले. भारतातील अलाहाबाद, पाटणा, सागर, म्हैसूर, दिल्ली, काशी इ. विद्यापीठांनी डि. लीट्. ही सन्मान्य पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. भारत सरकारने भारतरत्न हा सर्वश्रेष्ठ पुरस्कार देऊन त्यांच्या देशसेवेचा बहुमान केला (१९६२).

राजेंद्रबाबूंचे वयक्तिमत्त्व सर्वस्पर्शी आणि विशाल होते ते. धर्मनिष्ठ व परंपराभिमानी होते. पण रूढीप्रिय नव्हते. काळाच्या ओघाबरोबर आपले रीतिरिवाज बदलले पाहिजेत व समतेवर व माणुसकीवर आधारित नवसमाजाची घडण झाली पाहिजे, या मताचे ते होते. अशा या थोर नेत्याचे २८ फेब्रुवारी १९६३ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# हात आणि पायांच्या बोटांना वेदनेकडे दुर्लक्ष करणे गंभीर

बहुतेक लोकांच्या हात आणि पायांची बोटे दुखतात. या वेदनेकडे दुर्लक्ष केले जाते, पण जर ही समस्या दीर्घकाळ राहिली तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. कारण, छोटीशी समस्या कधी कधी मोठ्या आणि महागड्या समस्येमध्ये बदलू शकते. त्याचे परिणाम भयंकर होऊ शकतात. हात-पायांच्या बोटांच्या वेदनांना हे लागू होते. या वेदना कधी कधी काही गंभीर आजारांचे लक्षण असू शकतात.



तुम्ही या वेदनेला सामान्य म्हणून दुर्लक्ष करू नका, कारण कधी कधी ही समस्या तुम्हाला मोठ्या संकटात पाडू शकतात. त्यामुळे हात-पायांच्या बोटांच्या वेदना कोणत्या प्रकारच्या आजारांची सूचक असू शकतात, याबद्दल जाणून घेऊया:

हात आणि पायांची बोटे वातामुळे दुखू शकतात. वातामुळे आणि ऑस्टिओआर्थ्राइटिसमुळे बोटांना जडपण येणे, सूज येणे, आणि बोटे लाल होणे यासारखी समस्या होऊ शकते. रक्ताचा संचार थांबल्यामुळे या समस्येची तीव्रता वाढते.

मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्येही हात आणि पायांच्या बोटांमध्ये वेदना होतात. याशिवाय, बोटे जड होणे, सूज येणे इत्यादी समस्या देखील येऊ शकतात. ही समस्या मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये सर्रासपणे दिसते

संसर्गामुळेही हात आणि पायांच्या बोटांमध्ये वेदना होऊ शकतात. बोट कापण्यामुळे किंवा इन्फेक्शन झाल्यास बोटाल सूज येणे, लाल होणे आणि वेदना होणे अशी समस्या निर्माण होऊ शकते.

गॅन्लियन सिस्टमुळे हाताच्या बोटात आणि कंबरेत गाठी निर्माण होऊ शकतात. अशा स्थितीत त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे, कारण ही समस्या वाढू शकते.

कार्पल टनल सिंड्रोम ही एक सामान्य समस्या आहे. जेव्हा नसं ताणले जातात किंवा सूज येते, तेव्हा बोटांमध्ये वेदना होऊ शकते. ही वेदना बोटांपासून सुरू होऊन हातापर्यंत पोहोचू शकते. याशिवाय, पायांच्या बोटांमध्ये वेदना, सूज आणि लाल होणे देखील दिसू शकते. जर तुम्हाला यापैकी काही लक्षणे दिसत असतील, तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# अलिबाग नगरपालिकेचा शिलकी अर्थसंकल्प

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबास नगर परिषदेचा सन २०२६- २०२७या आर्थिक वर्षाचा कोणतीही करवाढ नसलेला १६० कोटी ८४ लाख रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. गुरुवारी (दि.२६) नगराध्यक्ष अक्षया नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

१६० कोटी ८४ लाख रुपयांपैकी भांडवली अनुदानातून ११० कोटी प्राप्त होणार आहेत. विविध अत्यावश्यक खर्च आणि विकासकांवर १६० कोटी ७४ लाखखर्च अपेक्षित आहे. घरपट्टी,पाणीपट्टी हे उत्पन्नाचे प्रमुख स्रोत आहेत,परतू यावर्षी यामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. इतर मार्गानि उत्पन्न वाढ करून आणि जास्तीत जास्त भांडवली अनुदान द्वारे शहरातील विकासकामे मार्गी लावण्यावर भर देण्यात येणार आहे.

शहरातील रस्ते, सुधारित पाणी योजना, पथदिवे, गटारे, आरोग्य, कचरा व्यवस्थापन अशा महत्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करून त्यावर अर्थसंकल्पात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. घरपट्टी, पाणीपट्टी आणि इतर कर यातून मिळणाऱ्या ३० कोटी उत्पन्नखेरीज १३० कोटी भांडवली अनुदानातून मिळणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात मागासवर्गीय दुर्बलघटकांसाठी २५ लाख तसेच महीला बालकल्याणासाठी २५ लाख आणि अंध आणि दिव्यांगासाठी २५ लाखांची तरतूद करण्यात आली आहे.

नमो उद्यान आणि वैशिष्टपूर्ण कमानतर्गत ४० कोटी निधी प्राप्त होणार असून त्या अंतर्गत हिराकोट तलाव परिसरात नमो उद्यान निर्मिती केली जाणार असून ,याखेरीज शहरामध्ये यावर्षी कंटेनर असेनारियम (मत्स्यालय) हा अलिबागचे पर्यटन विकासामध्ये भर घालणारा महत्वकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास जाणार आहे.

> **अलिबाग नगर परिषदेने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला पाणीपट्टीचे ३१ कोटी रुपये देणे आहे. त्याची त्याची अलिबाग नगर परिषदेच्या अर्थसंकल्पात नोंद नाही. त्यामुळे हा अर्थसंकल्प फसवा आहे.**
>
> **-संदीप पालकर, विरोधी पक्षनेते, अलिबाग नगर परिषद**

# रोहा तालुक्यात होळीतील पारंपरिक आट्यापाट्या खेळ दुर्मिळ होण्याच्या मार्गावर

**नागोठणे : बातमीदार**

कोकणवासियांचा अत्यंत महत्त्वाचा सण मानला जाणारा होळी सण उत्साहात साजरा होत आहे. मात्र या सणाशी निगडित असलेला पारंपरिक आट्यापाट्या हा मैदानी खेळ दिवसेंदिवस दुर्मिळ होत चालल्याचे चित्र दिसून येत आहे. होळीच्या काही दिवस आधी गावागावात रंगणारा हा खेळ आता क्वचितच पाहायला मिळत असल्याने तो नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.



आट्यापाट्या हा महाराष्ट्रातील एक उत्कृष्ट आणि चुरशीचा मैदानी खेळ मानला जातो. या खेळात एका संघातील खेळाडूंनी रेषांनी आखलेल्या चौकोनी पटांगणात प्रतिस्पर्धी संघातील खेळाडूंना अडवायचे असते, तर दुसऱ्या संघातील खेळाडूंनी चपळाई आणि हुलकावणी देत त्या रेषा पार करून पुढे जायचे असते. वेग, चातुर्य आणि संघभावना यांचा संगम असलेला हा खेळ ग्रामीण भागात विशेष लोकप्रिय होता.

कोकणासह रायगड जिल्ह्यात होळी सणाच्या साधारण दहा दिवस आधीपासून आट्यापाट्यांच्या सामन्यांना सुरुवात होत असे. गावातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण यात उत्साहाने सहभागी होत. त्यामुळे गावागावात स्पर्धात्मक वातावरण निर्माण होत असे आणि सणाला एक वेगळीच रंगत येत असे.

मात्र बदलत्या जीवनशैलीमुळे, मोबाईल आणि डिजिटल मनोरंजनाच्या वाढत्या प्रभावामुळे तसेच मोकळ्या मैदानी जागांची कमतरता यामुळे या खेळाकडे नव्या पिढीचे आकर्षण कमी होताना दिसत आहे. परिणामी, पूर्वजांनी जपलेला हा सांस्कृतिक वारसा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.

या पारंपरिक खेळाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शासनाने विशेष आर्थिक तरतूद करून शालेय व महाविद्यालयीन स्तरावर स्पर्धा आयोजित कराव्यात, तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावर या खेळाला प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी क्रीडाप्रेमींमधून होत आहे. आट्यापाट्या खेळाचा व्यापक प्रसार होऊन भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्याचा समावेश झाल्यास या पारंपरिक खेळाला पुन्हा एकदा सुगीचे दिवस येण्याची आशा आहे.

# 'पोस्को'कडून आरोग्य केंद्रांना संगणक संच आणि प्रिंटरचे वाटप

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम आणि डिजिटल करण्याच्या उद्देशाने, पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उपक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्र – गोरेगाव, इंदापूर, साई, नांदवी, शिरवली आणि निजामपूर तसेच तालुका आरोग्य केंद्र, माणगाव असे १३ संगणक संच आणि ७ प्रिंटर-स्कॅनरचे वितरण केले. हा वितरण कार्यक्रम तालुका आरोग्य केंद्र, माणगाव येथे उत्साहात पार पडला.




कार्यक्रमाला पोस्को कंपनीचे अधिकारी जी युन पार्क, महेंद्र तट्टे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद गोरेगांवकर तसेच आरोग्य विभागातील इतर पदाधिकारी आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि जलद आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. बदलत्या काळानुसार आरोग्य व्यवस्थेत डिजिटल प्रणालीचे महत्त्व वाढले आहे. रुग्ण नोंदणी, अहवाल सादरीकरण, जन्म दाखला, शासकीय ऑनलाईन पोर्टलवरील माहिती भरणे, लसीकरण आणि इतर आरोग्यविषयक माहिती व्यवस्थापनासाठी संगणक प्रणाली अत्यावश्यक ठरत आहे.

सदर उपकरणांमुळे आरोग्य केंद्रांमधील दैनंदिन कामकाज अधिक सुटसुटीत, पारदर्शक आणि वेगवान होणार आहे. डिजिटल सुविधा उपलब्ध झाल्यामुळे रुग्णांच्या नोंदी अचूकपणे जतन करता येतील, तसेच शासकीय अहवाल वेळेत सादर करता येणार आहेत. परिणामी सर्वसामान्य नागरिकांना अधिक प्रभावी आणि वेळेवर सेवा मिळण्यास मदत होईल.

# खालापुरात दोन अपघातात दोघे ठार

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर पेण मार्गावर खालापूर गावातून एक्सप्रेस वे कडे जाणाऱ्या जिओ पंपाजवळ मोटारसायकला ट्रकने धडक दिल्याने विशाल चाळके ३५ रा. वरोसे गाव चौक हा गंभीर जखमीं झाला. अपघात झाल्यानंतर घटनास्थळी पोलीस स्थानिक नागरिक मदतकार्य करत असताना कोणत्याही वाहन चालकाने जखमीला व्यक्तीस हॉस्पिटल पर्यंत नेण्यासाठी मदत केली नाही. वेळेत उपचार मिळाले नाही, तसेच खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपलब्ध नसल्याने ८ किमी अंतरावरील ग्रामीण रुग्णालय चौक येथे उपचारासाठी नेले जात होते दुर्दैवाने गोल्डन अवर्समधे मदत न मिळाल्याने विशाल ने वाटेतच मृत्यूला कवटाळले.



आजीचे दशक्रिया विधी साजगाव पुंडलिक मंदिर घाटावर उरकून घरी परतत असताना ही घटना घडली. सामाजिक कार्यकर्ते राजेश पार्टे, पपू पाटील, योगेश मेढेकर पोलीस कर्मचारी प्रकाश वाढवे व सहकारी यांनी घटनास्थळी दाखल होत जखमीला उपचारासाठी चौक ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. ही घटना सकाळी १० वा सुमारास घडली

**दुसऱ्या घटनेत**

जुन्या मुंबई पुणे महामार्गावर खोपोली एक्झिट नंतर मीळगाव ठाकूरवाडी येथे कंटेनर उलटला या घटनेत चालक जागीच ठार झाला. ही घटना सकाळी ७ वा सुमारास घडली.

# माजी नगराध्यक्ष लक्ष्मणशेठ साबळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध उपक्रम



**खोपोली : प्रतिनिधी**

आपल्या नगराध्यक्ष कालावधीत नगरपरिषद कामकाजाचे थेट प्रक्षेपण करून पारदर्शक कामकाजाचा दर्शन घडविणारे माजी नगराध्यक्ष स्वर्गीय लक्ष्मण शेठ साबळे यांचा २४ व्या पुण्यतिथी निमित्त विक्रम साबळे फाउंडेशनच्या वतीने विविध समाजिक उपक्रम राबविण्यात आले, याला खोपोलीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मुंबई पुणे महामार्गावरील महाराजा मंगल कार्यालयात यानिमित्ताने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यात समर्पण रक्तपेढी तर्फे रक्तदान शिबिर, शंकर आय हॉस्पिटल द्वारे नेत्र तपासणी शिबिर, इंडियन कॅन्सर ट्रीटमेंट तर्फे पूर्व कर्करोग तपासणी व इतर महिलांच्या आरोग्य संबंधित शिबिराचे आयोजन करण्यात आले होते याचवेळी गायिका प्रणिता ताई देशमुख यांच्या अभंगवाणी कार्यक्रमाने उपस्थित मान्यवरांचे मने जिंकली.

प्रारंभी स्वर्गीय लक्ष्मणशेठ साबळे यांच्या प्रतिमेस पत्नी माजी नगरसेविका काशीबई साबळे यांनी पुष्पहार अर्पण केल्यानंतर चिरंजीव व भाजप नेते यशवंत साबळे, काशी होम संचालिका रेणुका साबळे व नातू व उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी पुष्प वाहून अभिवादन केले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन स्वतः उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी रक्तदान करून प्रारंभ केला.

यावेळी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, आरोग्य सभापती मयुरी शेलार, बांधकाम सभापती अनिल सानप, नियोजन सभापती प्रतीक्षा रेटरेकर, नगरसेवक संदीप पाटील, अमित फाळे, विनायक तेलवणे, राहुल गायकवाड, रूपाली जाधव, हरीश काळे, विनिता कांबळे, सानिया शेख, अविनाश किरवे, रेशमा गायकवाड, दिनेश थोरवे, अश्विनी अत्रे या नगरसेवकांसहित, भारतीय जनता पक्षाचे काशिनाथ पारठे, अविनाश तावडे, डॉक्टर निकेत पाटील, विभावरी पाठक, अपर्णा साठे, रसिका शेटे, माजी नगरसेवक मोहन अवसरमल, मोहसीन शेख इत्यादी सह अनेक मान्यवर, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच मोठ्या प्रमाणात शिबिरार्थी उपस्थित होते.





# मध्य रेल्वे होळीसाठी २० अतिरिक्त विशेष गाड्या चालवणार

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे द्वारे येत्या होळी सणात प्रवाशांच्या सोयीसाठी २० अतिरिक्त विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत.

चालवण्यात येणाऱ्या विशेष गाड्यांमध्ये लोकमान्य टिळक टर्मिनस – मडगांव – लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष (४ सेवा) चालवण्यात येणार आहे यामध्ये ट्रेन क्रमांक ०१००३ साप्ताहिक विशेष दिनांक ०२.०३.२०२६ आणि ०९.०३.२०२६ रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर सोमवारी ०८.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी मडगांव येथे २२.४० वाजता पोहोचेल. (२ सेवा)

ट्रेन क्रमांक ०१००४ साप्ताहिक विशेष गाडी दिनांक ०१.०३.२०२६ आणि ०८.०३.२०२६ रोजी दर रविवारी मडगांव येथून १६.३० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०५.५० वाजता पोहोचेल. (२ सेवा)

या गाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगांव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिविम आणि करमाळी हे थांबे देण्यात आले.

दिवा – चिपळूण – दिवा अनारक्षित विशेष (१६ सेवा) चालवण्यात येणार आहे. यामध्ये

ट्रेन क्रमांक ०११५९ अनारक्षित विशेष दिनांक ०१.०३.२०२६ ते ०८.०३.२०२६ पर्यंत दिवा येथून दररोज २३.२५ वाजता सुटेल आणि चिपळूण येथे दुसऱ्या दिवशी ०६.३० वाजता पोहोचेल.

ट्रेन क्रमांक ०११६० अनारक्षित विशेष दिनांक ०१.०३.२०२६ ते ०८.०३.२०२६ पर्यंत चिपळूण येथून दररोज १५.३० वाजता सुटेल आणि दिवा येथे त्याच दिवशी २३.१० वाजता पोहोचेल.

या गाडीला निळजे, तळोजा पांचनंद, कळंबोली, पनवेल, सोमाटणे, आपटा, जिते, पेण, कासू, नागोठणे, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगांव, गोरेगांव रोड, वीर, सापे वामणे, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कळंबणी बुद्रुक, खेड आणि अंजणी हे थांबे देण्यात आले आहे.या गाड्या अनारक्षित म्हणून चालवण्यात येतील आणि सुपरफास्ट मेल/एक्सप्रेस गाड्यांसाठी सारखे सामान्य शुल्क आकारले जाईल याची प्रवाशांनी नोंद घ्यावी.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर प्रचंड वाहतूक कोंडी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर आज सकाळ पासून पुणे लेनवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली असून पाच ते सहा किमी पर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

शनिवार, रविवार, आणि सोमवारी होळी असल्याने अश्या सलग तीन दिवस सुट्या आल्याने मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली असून आज सकाळ पासून पुणे लेन वरील अमृताजण ब्रिज पासून आडोशी बोगद्या पर्यंत अश्या एकूण पाच ते सहा किमी पर्यंत वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्या होत्या,



होळी सणाच्या मुहूर्तावर चाकरमाणी गावाला जातं आहेत आणि हौशी पर्यटक हे बाहेर फिरायला पडल्याने मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे, त्यातच मोठी वाहने बेशिस्त वाहन चालक लेनची शिस्त पालत नसल्यानेही या बोरघाटात वाहतूक कोंडी होत आहे

मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर शनिवार रविवार आल्याने ही वाहतूक कोंडी नित्याचीच होत असल्याने याचा नाहक त्रास वाहन चालकांना आणि पर्यटकांना सहन करावा लागत आहे, ही वाहतूक कोंडी सुरळीत करण्यात बोरघाट महामार्ग पोलीस पंधरा मिनिटांचा ब्लॉक घेऊन वाहतूक कोंडी फोडण्याचे प्रयत्न करीत आहेत.

## रेवदंडा बायपास रस्त्यावर कुत्र्यांचा उपद्रव

**रेवदंडा :** रेवदंडा बायपास रस्तावर कुत्रांचा उपद्रव फारच वाढला असून येथून पायी प्रवास करणे धोक्याचे बनले आहे. रेवदंडा बायपासला अनेक ठिकाणी ग्रामस्थांच्या हलगर्जीने तयार झाले आहेत, या डंपिग ग्रांउडच्या कचरामध्ये अनेक प्रकारचे घाण कचरा, तसेच बॉयलर कोंबडीचे अवयव आदी प्रकारचा कचरा असल्याने परिसरातील असंख्य कुत्री जमा होतात

# तटकरे महाविद्यालयात स्वसंरक्षण प्रशिक्षण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत कार्यरत द. ग. तटकरे महाविद्यालय येथे महिला विकास कक्षाच्या वतीने दिनांक २५ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, धैर्य आणि सजगता निर्माण करणे हा होता. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत प्रत्येक मुलीने आत्मसंरक्षणाचे तंत्र आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याची जाणीव या कार्यक्रमातून करून देण्यात आली.

कार्यक्रमासाठी प्रमुख प्रशिक्षक म्हणून प्रख्यात मार्शल आर्ट तज्ज्ञ मा. श्री. संजय गमरे आणि कु. श्रेयस गमरे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह विविध स्वसंरक्षण तंत्रे शिकवली. अचानक उद्भवणाऱ्या प्रसंगांना धैर्याने कसे सामोरे जावे, संकटसमयी मानसिक स्थैर्य कसे राखावे, तसेच दैनंदिन जीवनात सुरक्षिततेच्या कोणत्या उपाययोजना अवलंबाव्यात याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी आयक्यूएसी विभाग प्रमुख डॉ. जे. आर. पांडेय यांनी विद्यार्थिनींना संबोधित करताना सांगितले, आजच्या काळात स्वसंरक्षण ही केवळ गरज नसून प्रत्येक मुलीची ताकद आहे. आत्मविश्वास आणि सजगता हीच खरी सुरक्षिततेची गुरुकिल्ली आहे. त्यांच्या या शब्दांनी उपस्थित विद्यार्थिनींमध्ये नवचैतन्य संचारले. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रत्यक्ष सराव सत्रांमध्ये त्यांनी आत्मविश्वासाने विविध तंत्रांचा सराव केला. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महिला विकास कक्ष प्रमुख प्रा. वृषाली सालस्कर, प्रा. अंकिता म्हस्के, प्रा. नाजिया जुम्मल, डॉ. नमिता मोरे, प्रा. श्रावणी बक्कम, प्रा. आयेशा बडे, प्रा. अश्विनी शेलार, प्रा. तेजस्विनी आचार्य, प्रा. श्वेता सकपाळ तसेच विद्यार्थिनी प्रतिनिधी यांचे मोलाचे योगदान लाभले.


**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल**

४७१ कापड बाजार, टिळक रोड,पनवेल - ४१० २०६, जि. रायगड ईमेल आयडी
panvel_urban65@rediffmail.com
/panvelurban0065@gmail.com

**शुध्दिपत्र**

दि . २५.०२. २०२६ रोजी दै . रामप्रहार , रायगड या वर्तमानपत्रामध्ये पुष्ठ क्र. ५ वर प्रसिध्द झालेल्या लिलाव विक्री सुचनेचा संदर्भ घ्यावा कर्जदराचे नाव श्री. बाळाराम कृष्णा पाटील (कर्जदार) सदर जाहीरातीमध्ये नजरचुकीमुळे काही चुका झालेल्या आहेत त्या चुका सुधारुन कृपया खालीलप्रमाणे वाचाव्यात.

| नजरचुकीमुळे छापून आलेला मजकूर | सुधारित वाचावयाचा मजकूर |
|---|---|
| श्री. दिलिप बाळू खुटले यांच्या नावे असलेला अकृषिक क्षुखंड, सर्व्हे क्र. ५२, हिस्सा क्र. ७, प्लॉट क्र. ६, क्षेत्रफळ ४०० चौ. मीटर्स, गाव नांदगाव, ता. पनवेल, जि. रायगड या स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारानी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट ख्ली उल्लेखिलेल्या ठिकाणी २२ मार्च, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता किंवा त्यापूर्वी आणावा/ पाठवावा आणि ईएमडी रककम दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी. | श्री. बाळाराम कृष्णा पाटील यांच्या नावे असलेल्या, पनवेल, तालुका-पनवेल, जि. रायगड येथील सदनिका क्र. बी-१०१, बी विंग, पहिला मजला, मातृ छाया कॉम्प्लेक्स सीएचएस लि., क्षेत्रफळ-११४२ चौ.फू. सीटीएस क्र.११९१ आणि सीटीएस क्र.११९१/१ या स्थावर मालमत्ताच्या खरेदीकरिता प्रस्ताव असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारांनी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी दि. २० मार्च, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता किंवा त्यापूर्वी आणावा/ पाठवावा आणि ईएमडी रक्कम दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी. |

✸ उपरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास/ आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा. जाहिरातीमध्ये इतर मजकूर अपरिवर्तनीय राहिल.



**खालापूर नगरपंचायत**

मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड,
स्थापना- २६ जुन २०१५
दुरध्वनी क्र. ०२१९९२- २७५०१५ , पिन नं- ४१०२०२
Email ID :- coud.khalapur@maharashtra.gov.in

नपंखा/उपाध्यक्ष निवडणूक/९१६/२०२५-२६ | दिनांक :- २७/०२/२०२६

**नमुना - ब जोडपत्र**

खालापूर नगरपंचायत उपाध्यक्ष पदाचा निवडणूक कार्यक्रम व विशेष सभा कामकाज

| | | |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र ज्या अधिकाऱ्याकडे दाखल करावयाचे आहे. त्या अधिकाऱ्याचे पदनाम व स्थळ | मुख्याधिकारी खालापूर नगरपंचायत स्थळ - मुख्याधिकारी खालापूर नगरपंचायत कार्यालय |
| २ | नामनिर्देशन देणे व स्विकारणेचा दिनांक/वेळ | दिनांक ०४/०३/२०२६ (बुधवार) रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० पर्यंत |
| ३ | नामनिर्देशन पत्राची छाननी | दिनांक ०४/०३/२०२६ (बुधवार) रोजी वेळ दुपारी २.०० नंतर |
| ४ | नामनिर्देशन पत्रे फेटाळण्यात आलेली आहेत त्या उमेदवाराची नावे आणि नामनिर्देशन पत्रे फेटाळण्याची कारणे सुचना फलकावर प्रसिध्द करणे | दिनांक ०४/०३/२०२६ (बुधवार) रोजी वेळ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | पिठासीन अधिकाऱ्याचे निर्णयाविरुध्द अपील दाखल करण्याचा कालावधी | दिनांक ०५/०३/२०२६ (गुरुवार) रोजी सकाळी ११.०० पासून ते दुपारी २.०० वाजेपर्यंत |
| ६ | वैध नानर्निर्देशन पत्राची यादी सुचना फलकावर प्रसिध्द करणे | दिनांक ०५/०३/२०२६ (गुरुवार) रोजी सायंकाळी ३.०० नंतर |
| ७ | उमेदवारी मागे घेणे | दिनांक ०५/०३/२०२६ (गुरुवार) रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत |
| ८ | अंतिम यादी प्रसिध्द करणे | दिनांक ०५/०३/२०२६ (गुरुवार) रोजी सायंकाळी ४.०० वाजलेनंतर |
| ९ | उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक विशेष सभा दिनांक व वेळ | दिनांक ०६/०३/२०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ११.०० वाजता |
| १० | निवडणूक लढविणाऱ्या व उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे विशेष सभेत वाचून दाखविणे | दिनांक ०६/०३/२०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ११.१५ नंतर |
| ११ | उपाध्यक्ष पदाची निवडणूक घेणे व निकाल घोषित करणे | दिनांक ०६/०३/२०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ११.२० नंतर |

सही/-
(किशन ना.जावळे, भा.प्र.से)
जिल्हाधिकारी रायगड

# महाराष्ट्र भवनाच्या उभारणीस वेग

## नवी मुंबईला मिळणार नवी ओळख | आमदार मंदा म्हात्रेंच्या प्रयत्नातून साकारतेय भवन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्राच्या जनतेसाठी समर्पित असलेले 'महाराष्ट्र भवन' हे भव्य आणि लखलखते स्वप्न आता प्रत्यक्षात उतरण्याच्या प्रगत पथावर आहे.

या बहुउद्देशीय भवनाचे काम हे सिडको महामंडळामार्फत जलद गतीने सुरू आल्याचे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्या २४ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्राद्वारे आमदार मंदा म्हात्रे यांना कळविण्यात आले आहे . तसेच महाराष्ट्र भवनाच्या इमारतीमध्ये ३ बेसमेंट + तळमजला + १५ मजले प्रस्तावित आहे. सदर भूखंड हा किनारपट्टी नियमन क्षेत्रामध्ये येत नसल्याने त्या संदर्भातील वैधानिक परवानगीची आवश्यकता नसल्याचे देखील म्हटले आहे.



त्याच बरोबर पर्यावरण विभागाची देखील मंजुरी प्राप्त झाली असुन बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्रदान केले आहे. तसेच कंत्राटदाराला कार्यदेश सुद्धा दिले असल्याचे सदर पत्रात नमूद केले आहे.

सद्यस्थितीत ०३ मजल्याचा बांधकामांसाठी उत्खननाचे काम सुरू असून शोअर पायलिंगचे काम हे प्रगतीपथावर सुरू आहे. त्यामुळे या सदर भवनामध्ये अत्याधुनिक सुविधा, प्रशस्त सभागृह, प्रदर्शन गॅलरी, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त व्यासपीठ अशा अनेक सोयी येथे उपलब्ध होणार आहेत. महाराष्ट्र भवनाचे प्रथम दर्शनी भागामध्ये महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्यदिव्य बैठी पुतळा असणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने भवनामध्ये प्रवेश करताच छत्रपती शिवाजी महाराजाचे दर्शन घेऊन त्यानंतरच महाराष्ट्राची आठवण होणार आहे. महाराष्ट्र भवन हे आपल्या राज्याच्या संस्कृतीचा आणि प्रगतीचा प्रतीक ठरणार आहे. हे भवन वाशीत उभं राहणं म्हणजे नवी मुंबईच्या विकास यात्रेत एक ऐतिहासिक पाऊल आहे, असे आमदार मंदा म्हणाल्या.

या सुंदर महाराष्ट्र भवनामध्ये अभ्यागतांसाठी विश्रांती कक्ष, व्ही.आय.पी. रूम तसेच लोकप्रतिनिधीं सोबत येणारे त्यांचे सारथी, सहकारी, वाहन चालक किंवा कर्मचाऱ्यांकरिता ही विश्रांती रूम असणार आहेत.

**महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून नागरिक कामांसाठी, वविध स्पर्धा परीक्षांसाठी मुंबई येथे येत असतात. मात्र हॉटेलचा खर्च परवडत नसल्याने अनेक जण मिळेल तो आसरा शोधतांना दिसतात. ज्या महाराष्ट्र भवनासाठी सन २०१४ पासून माझा जो लढा चालला होता त्याला आज पूर्णविराम लागला असून या महाराष्ट्र भवनाचा फायदा हा नवी मुंबईलाच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्र राज्याला होणार आहे. सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर हे भवन महाराष्ट्रातील जनतेसाठी अभिमानाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.**
**– मंदा म्हात्रे, आमदार**

# सफाई कामगारांना वारसा हक्काने नोकरी

## दिरंगाई करणाऱ्या आस्थापना प्रमुखावर होणार कारवाई

**उरण : बातमीदार**

आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांची माजी मंत्री प्रवीण प्रतापराव भोसले, रविंद्र प्रतापराव भोसले , कामगार नेते संतोष पवार, यांनी सफाई कामगारांना वारसाहक्काने नोकरी मिळावी या विषयाच्या अनुषंगाने नगरपालिका प्रशासन संचालनालय, सीबीडी बेलापूर,नवी मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेतली. यावेळी आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांच्या समवेत सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरी मिळावी या मागणीसंदर्भात अभ्यासपूर्ण सविस्तर चर्चा झाली.



यावेळी उपायुक्त रमाकांत गोसावी, मनोहर पाटील, सफाई कामगारांचे वारस तसेच सुनील परब, गोपाळ सावंत, नितिन कदम आदी कामगार प्रतिनिधी, मान्यवर उपस्थित होते. चर्चेअंती आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांनी राज्यातील ज्या ठिकाणी सफाई कामगारांच्या वारसांना नोकरी देण्यासंदर्भात वेळोवेळी महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय निर्गमित झाले आहेत,त्या संदर्भात उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेश, संचालनालयाचे आदेश या सर्व शासन निर्णयांचे, परिपत्रकांचे तसेच आदेशाचे गांभीर्याने वाचन न करता विनाकारण दिरंगाई होत आहे अशा सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायती मधील आस्थापना प्रमुखांवर आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांनी नीयमोचीत कारवाई करण्याचे आदेश देण्याचा निर्णय घेतला आहे.

यामुळे राज्यातील ज्या ठिकाणी अशा प्रकारे सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरी मिळण्यासाठी विनाकारण अडथळे निर्माण झाले आहेत ते दूर होऊन न्याय मिळण्याची आशा पल्लवित झाली आहे.आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांच्या राज्यातील सफाई कामगारांना न्याय देण्याच्या अभ्यासपूर्ण सकारात्मक भुमीकेबद्दल माजी मंत्री प्रवीण भोसले यांनी आभार व्यक्त केले

# पनवेल एसटी आगारात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी भाषेचे कवी, कादंबरीकार, समीक्षक, प्रतिभावंत लेखक विष्णु वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी पनवेल एस.टी. आगारात उत्साहात साजरा करण्यात आला.

पनवेल बस स्थानकात झालेल्या कार्यक्रमास आगार प्रमुख ज्ञानेश्वर म्हात्रे, पत्रकार नितीन देशमुख, आगार लेखाकार श्रीमती रुचा थत्ते, कार्यशाळा प्रमुख मारोती बुट्टेपवाडव व पनवेल आगारातील कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक व प्रवासी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी आपणच आपल्या घरात बोलतांना मराठीचा वापर करण्याचा निर्धार केला कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करतांना निलेश नार्वेकर भाषेचे महत्व सांगितले.



# नवी मुंबई साहित्य परिषदेतर्फे मराठी भाषा गौरव दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई साहित्य परिषद आप्पा जोशी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीच्या निमित्ताने मराठी भाषा गौरव दिनाचा कार्यक्रम नवी मुंबई प्राथमिक विद्यालय वाशी या ठिकाणी संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नवी मुंबईतील शाळांमध्ये निबंध स्पर्धा घेण्यात आलेली होती. नवी मुंबईतील सुमारे दहा विद्यालयातील ९० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतला त्याचप्रमाणे १० शिक्षकांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतला. विशेष म्हणजे या स्पर्धेमध्ये इंग्रजी माध्यमातील ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सतीश सोळाकुरकर ओंकार मुळे, विशाल सुरावरकर लाभले होते.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऋतुजा गवस यांनी केले

प्रथमता विशाल सुरावरकर यांनी कविता अभंग आणि गझल यांचे सादरीकरण केले. त्यानंतर ओमकार मुळे यांनी डिजिटल पत्रकारिता मराठी भाषेची वैशिष्ट्ये मराठी भाषा शुद्धीसाठी करावयाचे प्रयत्न यांची माहिती दिली. प्रमुख वक्ते सतीशजी यांनी आपल्या लहानपणीच्या काही आठवणी विद्यार्थ्यांसाठी सादर केल्या. त्यानंतर त्यांनी बक्षीस आणि त्याचे आयुष्यातील महत्त्व या संदर्भातील त्यांचे लहानपणीची आठवण सांगितली.

# उरणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजस्व विशेष महसूल सप्ताह

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात महसूल व वन विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील कामकाजाची पुर्व तयारी व अंमलबजावणी करण्यासाठी विशेष महसूल सप्ताहाच्या आयोजनाला प्रारंभ झाला आहे. शेतकरी व नागरिकांनी या अभियानाचा लाभ घेण्याचे आवाहन उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी केले आहे. .

यामध्ये प्रामुख्याने अकृषिक रुपांतरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची आवश्यक नसणे,सनद प्रणाली संपुष्टात आणणे, एक वेळचे अधिमुल्य भरण्याची नवीन तरतूद, तुकडेबंदी कायद्यांतील सुधारणा वअभिलेख अद्ययावतीकरण आदी विविध सुधारणांचे लाभ सर्वसामान्य नागरिक, शेतकरी,महिला, विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष महसूल अभियान सुरू करण्यात आले होते. हे अभियान नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जनजागृती,प्रसार व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने उरण तालुक्यातही महसूल व वन विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील कामकाजाची २८ फेब्रुवारीपासून ५ मार्चपर्यंत पूर्वतयारी व अंमलबजावणी करण्यासाठी विशेष महसूल सप्ताहाच्या आयोजनाला सुरुवात केली आहे.

# खारघर पोलिसांकडून वाहन तपासणी

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरात होणाऱ्या 'हिंद-दी-चादर' या मोठ्या धार्मिक कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर खारघर पोलिसांनी सुरक्षा व्यवस्थेत मोठी वाढ केली असून मुख्य रस्त्यांवर कडक तपासणी सुरु केली आहे. कार्यक्रमासाठी लाखो भाविक उपस्थित राहण्याची शक्यता असल्याने कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे.

खारघरमधील प्रमुख चौक, सेंट्रल पार्क परिसर, तसेच तळोजा आणि पनवेलकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर नाकाबंदी करुन वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. संशयास्पद वाहनांची तपासणी, वाहनधारकांची ओळख पडताळणी आणि बेकायदेशीर वस्तुंवर लक्ष ठेवण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी राज्यभरातून तसेच बाहेरील राज्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक येणार असल्यामुळे वाहतूक व्यवस्थेवरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्गांची आखणी करण्यात आली आहे.

# जनगणना २०२७मधील हाऊस लिस्टिंगविषयक तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

विकासाची ध्येय-धोरणे ठरविण्यासाठी जनगणनेद्वारे प्राप्त होणारी माहिती अत्यंत महत्वाची असून हे काम काळजीपूर्वक व बिनचूक करावे असे महापालिका आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले.

जनगणना कार्य निर्देशालय महाराष्ट्र यांच्या वतीने जनगणना २०२७ विषयक कार्यवाही सुरु होत असून त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेचे चार्ज अधिकारी, अतिरिक्त चार्ज अधिकारी व जनगणनेशी संबधीत अधिकारी,कर्मचारी यांना पहिल्या टप्प्यातील घरांची यादी तयार करणे विषयक प्रशिक्षण कार्यक्रमप्रसंगी ते आपले मनोगत व्यक्त करीत होते.

नवी मुंबई महानगरपालिकेची नुकतीच झालेली निवडणूक अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने पार पडली असून त्याचे सारे श्रेय क्षेत्रिय स्तरावर काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचे आहे. तशाच प्रकारची उत्तम कामगिरी जनगणनेच्या कामातही महापालिका अधिकारी,कर्मचारी जबाबदारीने करतील असा विश्वास व्यक्त केला. यावेळी प्रथमत:च डिजीटल पध्दतीने जनगणना होणार असून यामधील तांत्रिकी प्रक्रिया पूर्णपणे समजून घेऊन जबाबदारीने काम करावे असे निर्देश आयुक्तांनी दिले. या कार्यवाहीत उपलब्ध होणारा माहितीचा साठा महानगरपालिकेच्या योजना, धोरणे यांची अंमलबजावाणी करण्यासाठीही उपयोगी ठरणार असून हे काम नियोजित कालावधीत दैनंदिन कामांकडे लक्ष देऊन शिस्तबध्द रितीने पूर्ण करावे अशा सूचना देण्यात आल्या.

यावेळी बोलताना शहर जनगणना अधिकारी तथा परिमंडळ २ उपआयुक्त संजय शिंदे यांनी जनगणनेचे राष्ट्रीय काम अत्यंत महत्वाचे असल्याचे सांगत १८७२ मध्ये पहिली जनगणना झाली होती. ही जनगणना देशातील १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना आहे असे सांगितले. या जनगणनेचे वैशिष्ट म्हणजे ही पहिली डीजिटल जनगणना असून यामध्ये मोबाईल ॲपव्दारे माहितीची नोंदणी होणार आहे तसेच पत्याचे जिओ टॅगिंग केले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात घर यादी गटानुसार माहिती संकलित केली जाणार आहे या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबीरात सहा. संचालक जनगणना तेजल कटारे व सांख्यिकी विधी अधिकारी तुषार पाटील हे सादरीकरणाव्दारे जनगणना प्रक्रियेची संपूर्ण माहिती देणार आहेत. आजच्या पहिल्या दिवशीचे प्रशिक्षण सत्र यशस्वीरित्या संपन्न झाले

# रंगबेरंगी पिचकाऱ्या बाजारात दाखल

## विविध प्रकारचे पर्याय उपलब्ध | बच्चेकंपनीची वाढली गर्दी

**उरण : बातमीदार**

संपूर्ण महाराष्ट्रात होळी व रंगपंचमी सण मोठया उत्साहात साजरा केला जातो.राज्यासह रायगड जिल्ह्यात होळीनंतर दुसऱ्या दिवशी रंगपंचमी साजरा केला जातो. या निमित्त एकमेकाच्या अंगावर रंगाची उधळण केली जाते. त्यासाठी लागणारे पर्यावरण पुरक रंग तसेच वेगवेगळ्या आकाराच्या व रंगाच्या पिचकाऱ्या जिल्ह्यातील प्रत्येक बाजारात दाखल झाल्या आहेत.

उरण तालुक्यातील बाझारपेठ मध्येही पिचकाऱ्या व रंग मोठया प्रमाणात दाखल झाले आहेत.यंदा मात्र रंगासह पिचकाऱ्यांच्या किंमतीमध्ये पाच टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे एका वस्तूमागे किमान ५ रुपये अधिक मोजण्याची वेळ ग्राहकांवर येणार आहे. धुलिवंदननिमित्त रंगाची उधळण करण्याचा खेळ ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी साजरा केला जातो. ही परंपरा आजही जपली जाते.

यावर्षी यंदा सोमवार दि २ फेब्रुवारी रोजी होळी आहे.होळी



उभारून पारंपारिक व धार्मिक पद्धतीने विधीपत पूजन केली जाणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि.३) धुलिवंदन आहे. या दिवशी सकाळपासून सर्वच ठिकाणी रंगाची उधळण केली जाणार आहे. एकमेकांच्या अंगावर रंग उडवून धुलिवंदनाचा आनंद लुटला जाणार आहे. धुलिवंदन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे.

धुलिवंदन साजरा करण्यासाठी लागणारे रंग, बेगवेगळ्या रंगाच्या च आकाराच्या पिचकाऱ्या बाजारात दाखल झाल्या आहेत. साध्या पिचकाऱ्यांसह बंदुकवाल्या आणि टँकरवाल्या पिचकाऱ्यांची दुकाने सजली आहेत. तसेच, मुलाच्या आवडीचे छोटा भीम, बेनटेन, बॉबी डॉलची कार्टून असलेली पिचकारी देखील बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाली आहे.

या पिचकाऱ्यांची किंमत १० रुपायंपासून ३०० रुपयांपर्यंत आहे. काही ठिकाणी किंमती स्थीर आहेत. तर, काही ठिकाणी या वस्तूंच्या किंमतीमध्ये ५ ते १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. वस्तू बनविण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने या वस्तूंचे दर काही प्रमाणात बाढविण्यात आले आहे. महागाईची झळ असतानाही त्यावर मात करीत धुलिवंदन सण साजरा करण्यासाठी खरेदीला पसंती दिली आहे. उरण तालुक्यात बाजारात पिचकाऱ्या खरेदीला सुरुवात झाली आहे. आतापर्यंत ५० टक्के खरेदी झाली आहे. धुलिवंदनच्या दोन दिवस अगोदर म्हणजे २८ फेब्रवारी व १ मार्च या तारखेला ग्राहकांची गर्दी होण्याची शक्यता असल्याचे उरण मधील विक्रेत्यांनी वर्तविले आहे.

उरण मध्ये काही ठिकाणी होळीच्या १० दिवस अगोदर लहान होळी पेटविण्याची परंपरा आहे. देऊळवाडी येथे श्री शीतळादेवी मंदिर समोर १०० वर्षाची ही परंपरा आज ही सुरु आहे

# शिमगोत्सवासाठी कोळी बांधव सज्ज

## नवी मुंबईत मच्छीमारांच्या होड्या आल्या बंदरांवर

**नवी मुंबई : बातमीदार**

आमचे दाराशी हाय शिमगा... या आनंदघोषांनी सध्या मुंबई आणि नवी मुंबई परिसरातील कोळीवाडे दुमदुमून गेले आहेत. शिमगा अर्थात होळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, प्रत्येक कोळीवाड्यात उत्साहाची लगबग सुरू झाली आहे. कष्टकरी पण तितकाच उत्सवप्रिय असलेला कोळी समाज हा सण दरवर्षी पारंपरिक पद्धतीने साजरा करतो.

विशेष म्हणजे शिमगोत्सवासाठी घराकडे परतलेल्या नौका आता बंदरकिनारी उभ्या करून रंगरंगोटीने नटत आहेत. रंगीबेरंगी पट्टे, झूल-झालरी, विविधरंगी झेंडे आणि शेंड्यावर डौलाने फडकणारा तिरंगा झेंडा यामुळे प्रत्येक होडीचे रूप खुलून गेले आहे. फुलांच्या आकर्षक माळांनी सजवलेल्या या होड्या जणू सणाच्या स्वागतासाठी सज्ज झालेलं चित्र सद्या सर्व कोळीवाड्यानंमध्ये दिसू लागलं आहे.



एके काळी फाल्गुन शुद्ध प्रतिपदेपासून पंधरा दिवस हा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा केला जायचा. यावेळी, चतुर्थीला होळीची सुरुवात म्हणून पहिली बारकी हावली किंवा कोंबार हावली म्हणून ओळखली जायची. ती होळी एरंडाच्या झाडासह जळाऊ लाकूड एकत्र करून पेटवली जायची. तर पौर्णिमेच्या दिवशी मोठी हावली किंवा गोटाची हावली ही मानाची असायची.

दरम्यान, होळी पोर्णिमेचा सण जसजसा जवळ येऊ लागतो तसतसा कोळीबांधवांच्या आनंदाला उधाण येतो. समुद्रकिनारी वसलेला कोळी समाज या उत्सवाच्या स्वागताला आठवडाभर आधी सज्ज होतो. नाखवा जाच्यावर आपले पोट भरतो त्या लक्ष्मीला म्हणजेच होडीला सागरकिनारी आणून, तिला रंगरंगोटी करून होडीची मालकीण म्हणजेच नाखविणीच्या नव्याकोऱ्या साडीचा झेंडा तयार करून होडीला बांधला जातो असं रुपाली राजेंद्र कोळी यांनी सांगितले.

# रायगडात पर्यावरणस्नेही होळीचा जागर

**पाली : प्रतिनिधी**

होळी आणि धुळवड हे सण रंगांचा आनंद आणि नात्यांमध्ये गोडवा निर्माण करणारे उत्सव मानले जातात, मात्र, या सणांच्या निमित्ताने होणारी बेसुमार वृक्षतोड, पाण्याचा अपव्यय आणि रासायनिक रंगांचा वाढता वापर ही एक गंभीर समस्या बनली आहे. या पार्श्वभूमीवर पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात यंदाही पर्यावरणस्नेही होळीचा जागर पाहायला मिळत आहे. अनेक समाजसेवी संस्था, कार्यकर्ते आणि संवेदनशील नागरिक यासाठी मोठ्या उत्साहाने पुढाकार घेत आहेत.

फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला होणारी होळी, त्यानंतरची धुळवड आणि वद्य पंचमीची रंगपंचमी या तिन्ही उत्सवांना जिल्ह्यात 'शिमगोत्सव' म्हणून मोठे महत्त्व आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस),सुधागड –रायगडच्या वतीने यंदाही होळी लहान करा, पोळी दान करा असे आवाहन करण्यात आले आहे. होळीच्या अग्नीत पुरणपोळ्यांचा नैवेद्य जाळण्याऐवजी त्या संकलित करून आदिवासी वाड्यांमधील गोरगरिबांना वाटप करण्याचा विधायक उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील हजारो गरिबांची होळी यंदा 'गोड' होणार आहे.

अंनिसचे जिल्हाध्यक्ष विवेक सुभेकर यांनी सांगितले की, पेण, नागोठणे, पाली, रोहा यांसह जिल्ह्यातील विविध शाखांच्या माध्यमातून या मोहिमेला मोठा पाठिंबा मिळत आहे. पाली येथील रोशन रुईकर यांनी नमूद केले की, 'संघर्ष समाज सेवेसाठी ग्रुप' व अंनिस पाली शाखेच्या वतीने मागील वर्षी एक हजाराहून अधिक पोळ्यांचे वाटप करण्यात आले होते, ही परंपरा यंदाही सुरू राहणार आहे.





### वांगणी गावचा १३ वर्षांचा आदर्श

*रोहा तालुक्यातील वांगणी गावाने वृक्षतोडीच्या पारंपरिक गैरसमजाला छेद दिला आहे. गेल्या १३ वर्षांपासून या गावातील ग्रामस्थ होळीसाठी एकही जिवंत किंवा हिरवे झाड न तोडता होळी साजरी करत आहेत. पाच दिवस आधीच गावात दवंडी पिटवून जनजागृती केली जाते. नैसर्गिक आपत्तीत पडलेली किंवा वठलेली लाकडे वापरून येथे केवळ प्रतिकात्मक होळी साजरी केली जाते. विज्ञान शिक्षक टिळक खाडे म्हणतात, वांगणीच्या या कृतीचे अनुकरण गावोगावी झाल्यास दरवर्षी होणारी वृक्षांची कत्तल थांबून आपली वसुंधरा पुन्हा हिरवीगार होईल.*

### परंपरा आणि पर्यावरणाचा मेळ

*सुधागड तालुक्यातील हभप महेश पोंगडे महाराज यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून केवळ झाडे वाचवण्याचेच नव्हे, तर होळीला नवीन झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन केले आहे. तसेच सुधागडमधील वावे गावात तरुण कार्यकर्ते केतन म्हसके यांच्या नेतृत्वाखाली केवळ सुकी लाकडे आणि पेंढा वापरून होळी साजरी केली जात आहे. डॉ. अर्चना जैन व गणराज जैन हे दांपत्य गेल्या अनेक वर्षांपासून 'मोठी होळी' लावण्याच्या घातक स्पर्धेला विरोध करत पर्यावरणपूरक होळीचा संदेश देत आहेत.*

> **होळीसाठी झाडे तोडू नका. अनेक ठिकाणी होळी पेटविण्याऐवजी गावात एकाच ठिकाणी प्रतिकात्मक होळी पेटवा. होळीनिमित्त बोंबा मारणे, अपशब्द उच्चारणे यापासून कटाक्षाने लांब रहा. होळीमध्ये पोळी टाकण्याऐवजी ती गरजूंना द्या. पाण्याचा अपव्यय टाळून कोरड्या व पर्यावरणस्नेही रंगानी धुळवड व रंगपंचमी साजरी करा.**
>
> **–संदेश गायकवाड, कार्याध्यक्ष, 'अंनिस', रायगड**

# माणगाव पोलिसांनी चोरीला गेलेला मुद्देमाल फिर्यादींना मिळवून दिला परत

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव पोलीस आपले कर्तव्य नेहमीच बजावत असतात. त्यासोबत अनेक सामाजिक उपक्रमदेखील राबवतात. अशीच एक दमदार कामगिरी करीत माणगाव पोलीसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरीला गेलेला मुद्देमाल फिर्यादींना परत मिळवून दिला आहे.

माणगाव पोलीस ठाणे हद्दीत ७ ऑगस्ट २०२५ रोजी विदया नगर सिध्दी कॉम्प्लेक्स रूम नंबर ११२ मध्ये घडला फिर्यादी रविंद्र सोनु पादीर यांच्या राहत्या घरातून सोन्याचे दागीने व रोख रक्कम घरफोडी करून चोरीस गेले होते. या गुन्हयाचा तपास पो. नि. निवृत्ती बो–हाडे यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. नरेंद्र बेलदार, पो. ह. सुरज फडताडे, पो. शि. युवराज दहिफळे यांनी कौशल्यपूर्ण तपास करून आरोपीचा शोध घेवुन आरोपी कोमल गणेश महाडीक रा. विदया नगर सिध्दी कॉम्लेक्स हिला अटक करून फिर्यादी यांचा चौरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे.

यामध्ये ७१.५०० ग्राम वजनाचे काळे मनी असलेले मंगळसुत्र किंमत सुमारे २८६०००, ७.२५० ग्रॅम वजनाचे एक नेकलेस रु. ८००००, दोन कानातील सोन्याच्या रिंग ५.९५० गॅम किंमत रु. २३०००, रोख रक्कम २२००० असा एकूण ८,६१,००० रुपयांचा मुद्देमला जप्त करण्यात करून दि. २५ फेब्रुवारी रोजी फिर्यादी रविंद्र सोनु पादीर यांना पोलीस ठाण्यात बोलावुन परत केला आहे.

तसेच माणगाव पोलीस हद्दीत दि. २३ नोव्हेंबर २०२३ रोजी १०.३० ते ११.०० वा. चे दरम्यान फिर्यादी दिनेश मधुकर केकाणे रा. लोणशी यांच्या घरात चोरी झाली होती. या गुन्हयाचा तपास पो.स.ई. आघाव, पो.शि. विकास ढाकणे यांनी कौशल्यपुर्ण तपास करून आरोपीचा शोध घेऊन संकेत मुकुंद अजर्लेकर रा. दापोली यास अटक करून फिर्यादी यांचा चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत केला. यामध्ये एक सोन्याचे कानाचे नक्षीदार जोड वजन ५.३७० ग्राम किंमत ३८६०० रूपये, एक सोन्याचे कानाचे नक्षीदार कोड त्याचे वजन ३.५७० गॅम किंमत २५७०० रूपये असा एकण ६४,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून २५ फेब्रुवारी रोजी फिर्यादी दिनेश मधुकर केकाणे यांना पोलीस ठाण्यात बोलावून परत केला आहे. माणगाव पोलिसांनी केलेल्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# श्रीवर्धनमध्ये बॉक्साइडसह मोठ-मोठ्या दगडांची ओव्हरलोड वाहतूक सुरूच

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यात सध्या ओव्हरलोड बॉक्साइड वाहतुकीने अक्षरशः नागरिकांना त्रस्त करून सोडले आहे. ओव्हरलोड बॉक्साइट भरलेले अनेक मोठमोठे डंपर घाट मार्गावरून जात असताना अत्यंत संथपणे चालत असतात. काही वेळेला गिअर बदलताना ते मागे येतील की काय? अशी भीती मागच्या वाहन चालकांना वाटत असते.

बॉक्साईट वाहतूक करताना त्यावर आच्छादन असणे गरजेचे आहे, पण अनेक चालक बॉक्साईट वर आच्छादन टाकत नसल्याने नागरिकांना धुळीचादेखील सामना करावा लागतो.



अनेक दुचाकीस्वरांच्या डोळ्यात व नाकाद्वारे शरीरातदेखील धूळ जाते.

रस्त्यावरून जाणाऱ्या डंपरमधून धूळ उडाल्यास नागरिकांना श्वसनाचे व इतर आजार होत असल्याचे पहायला मिळत आहे. बॉक्साइटबरोबरच श्रीवर्धन जीवना बंदर व दांडा या ठिकाणी नवीन जेट्टीचे बांधकाम सुरू आहे.

या बांधकामासाठी (भराव करण्यासाठी) खूप मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड दगडाची वाहतूक करण्यात येत आहे. या ओव्हरलोड वाहतुकीमुळे सर्व रस्ते खराब होत असून अनेक ठिकाणी रस्त्यांना खड्डे पडले आहेत, तर बऱ्याच ठिकाणी रस्ता खचलेला पहायला मिळतो.

ओव्हरलोड बॉक्साइड वाहतुकीसोबतच अनधिकृत बॉक्साइडचे उत्खननदेखील श्रीवर्धन तालुक्यात जोमाने सुरू आहे, मात्र या उत्खननाकडे महसूल प्रशासनाकडून जाणीवपूर्वक डोळेझाक केली जात असल्याचा आरोप नागरिकांमधून केला जात आहे, कंपनीच्या अवजड दगड वाहतुकीला प्रतिबंध बसावा, जेणेकरून अपघात टाळता येतील, अशी मागणी होत आहे. अनेक वेळा ओव्हरलोड वाहतुकीमुळे वाहनांचे अपघात होतात व नागरिकांना प्राण गमवावा लागता.

प्रादेशिक परिवहन विभाग पेण यांनी अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तसेच परराज्यातून बॉक्साईट घेण्यासाठी येणाऱ्या वाहनांवरदेखील कडक दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांमधून करण्यात येत आहे.

# माझी वसुंधरा अभियानात वडगाव ग्रामपंचायत प्रथम

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वडगांव यांच्या प्रशासनाने लोकनियुक्त प्रतिनिधी नसतानादेखील तेथील ग्राम पंचायत अधिकारी सुहास वारे यांनी ग्रामस्थ यांना विश्वासात घेऊन उत्कृष्ट काम केल्याने माझी वसुंधरा अभियान ५.० हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रथम क्रमांकाने पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते स्वीकारला. महामहीम राज्यपाल आचार्य देवव्रत हेही उपस्थित होते.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत पाच ते दहा हजार लोकसंख्या गटामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गावांमध्ये वडगांव ग्रामपंचायतीचा राज्यात प्रथम क्रमांक आला. विशेष म्हणजे येथे लोकनियुक्त सदस्य नाहीत, ग्राम पंचायत अधिकारी सुहास वारे व ग्राम पंचायत प्रशासक विनोद चांदोरकर यांनी ग्रामस्थ यांना विश्वासात घेऊन माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व जतन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.



केलेल्या या कामगिरीबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि माझी वसुंधरा अभियान संचालनालय यांचे वतीने हा पुरस्कार देण्यात आला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, प्रकल्प संचालक सुधाकर बोबडे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, गटविकास अधिकारी संदीप कराड हे उपस्थित होते. माझी वसुंधरा अभियान ५.० हे सन २०२४–२५ मध्ये राबविण्यात आले होते. ग्रामपंचायत हद्दीतील सर्व ग्रामस्थ, कर्मचारी संबंधित कार्यक्षेत्रातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतल्याने हा पुरस्कार प्राप्त झाला असे ग्रामपंचायत अधिकारी सुहास वारे यांनी सांगितले.

# प्रियदर्शनी वाहतूक संस्थेच्या अध्यक्षपदी शैलेश रावकर

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील प्रियदर्शनी चालक–मालक वाहक वाहतूक संस्थेच्या अध्यक्षपदी शैलेश रावकर, तर उपाध्यक्षपदी सद्दाम दफेदार यांची सल्लागार मंडळ व संचालक मंडळ यांच्या एकमताने निवड करण्यात आली.



संस्थेतील अंतर्गत तडजोडीनंतर माजी अध्यक्ष सिराज पानसरे व उपाध्यक्ष प्रथमेश काळे यांनी पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर सहाय्यक निबंधक कार्यालय रोहा येथील मुख्य लिपिक एस.एल. कावले यांच्या अध्यक्षतेखाली पतसंस्थेच्या कार्यालयात निवडणूक प्रक्रिया झाली.

यावेळी संस्थेचे सल्लागार भाईसाहेब टके, किशोर जैन, मारुती देवरे, शिवराम शिंदे, हरीश काळे, संचालक बाळासाहेब टके, सिराज पानसरे, शैलेश रावकर, सद्दाम दफेदार, विठोबा दंत, झिमा कोकरे, सुहेल नाडकर, काशिनाथ जाधव, जितेंद्र जाधव, मुसद्दीक पोत्रिक, रमीज दफेदार, नरेश कोकरे, सचिव शकील शेख, मारुती भोसले आदी उपस्थित होते.

# न्हावे गावातील संजय तेटगुरेंनी फुलविला कलिंगडाचा मळा

**माणगाव : प्रतिनिधी**

आजच्या तरुणांनी नोकरीच्या पाठीमागे न धावता शेती व्यवसायाकडे वळून त्यातून आपली आर्थिक उन्नती साधली पाहिजे. अशीच एक भरारी माणगाव तालुक्यातील न्हावे गावातील सुशिक्षित बेरोजगार तरुण संजय शांताराम तेटगुरे यांनी घेतली असून त्यांनी आपल्या गावालगतच्या शेतजमिनीत कलिंगडाचा मळा फुलवून अथक मेहनतीच्या जोरावर ते आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने तीन महिन्याला दरवर्षी लाखो रुपयांचा नफा मिळवीत आहेत. त्यांचा हा व्यवसाय आजच्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांना आदर्श देणारा आहे.

न्हावे गावचे सुपुत्र संजय शांताराम तेटगुरे हे गरीब शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले व्यक्तिमत्व आहेत. त्यांचे शिक्षण एसवायबीएपर्यंत झाले. नंतर प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना पुढील उच्च शिक्षण घेता आले नाही. यानंतर त्यांनी शेती व्यवसायाकडे वळण्याचा निर्णय घेतला. यातून ते कमालीचे यशस्वी झाले. गेली दहा–बारा वर्षांपासून ते आपल्या गावालगतच्या शेतजमिनीत कलिंगड पिकाची लागवड करून तीन महिन्याला लाखोंचे उत्पादन घेत आहेत. यावर्षी त्यांनी आपल्या न्हावे गावालगतची २० एकर जागा कलिंगड लागवडीसाठी भाड्याने घेतली.



कलिंगड लागवड करण्याकरिता तेटगुरे यांनी सांगली जिल्ह्यातून सिंबा, गोल्डन, सुपरीत, फ्रुटी जातीचे चार लाख रुपये किंमतीचे सव्वा लाख कलिंगडाची रोपे विकत आणली. भाड्याने घेतलेल्या या शेतीची ट्रॅक्टर व मशागत करण्यासाठी लागणाऱ्या अन्य साधनांचा वापर करून कलिंगड फळाला उपयुक्त ठरेल अशी आळी तयार करून या रोपांची आपले सहकारी मेव्हणे साहिल बिंदुगडे, संजय बिंदुगडे, स्वप्नील बिंदुगडे, शुभम बिंदुगडे यांच्या मदतीने नोव्हेंबर २०२५च्या अखेरीस लागवड केली.

या रोपांना जवळच असलेल्या नदीतून पाणी पंप लावून तसेच खते वापरून सलग चांगल्या प्रकारे फुलविले. तीन महिन्यात संजय यांच्या कलिंगडाच्या मळ्यात चांगली रसाळ, लालसर व गोड कलिंगड तयार होऊन यातील गोल्डन जातीचा कलिंगड १० किलो वजनाचा तयार झाला असून सिंबा जातीचा ६ ते ७ किलो वजनाचा कलिंगड तयार झाला आहे. संजय यांचे तयार झालेले हे कलिंगड व्यापाऱ्यांनी ठाणे, मुंबई, गुजरात याठिकाणी विक्रीसाठी नेले आहेत.

यावर्षी २० एकर जागेत हे कलिंगड पीक घेण्यासाठी संजय याला साधारण १६ लाख रुपये इतका खर्च आला असून हा सर्व खर्च वजा करून महिन्याला १५ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळाला आहे.

# माणगावात उतेखोल केंद्राचा बाल आनंद मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद केंद्र उतेखोल तालुका माणगाव या केंद्राचा वार्षिक बाल आनंद मेळावा व विविध कार्यक्रम कुणबी भवन हॉल, निजामपूर रोड याठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात झाला.

सकाळी १०.३० ते दुपारी ३ यावेळेत या बाल आनंद मेळाव्यात केंद्र उतेखोल मधील १३ शाळांच्या बाल – गोपाळ विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम व गमतीदार खेळांचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. या केंद्र उतेखोलच्या बाल आनंद मेळाव्याचे मान्यवरांनी विशेष कौतुक करताना केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे व सहकाऱ्यांचे मनापासून अभिनंद केले.

या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा यांच्याहस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी माणगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, चारिझेन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, चारिझेन फाउंडेशनचे कार्यकर्ते किशोर झेमसे, माणगाव शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर समितीच्या कार्याध्यक्षा तथा आदर्श शिक्षिका विनया जाधव, परीक्षक शिक्षक सुधा साळवी, योगेश शेलार, केंद्रातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, तालुक्यातील विविध शाळांचे शिक्षक, पालकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माणगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी बोलताना केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांचे कौतुक केले. ते असे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवित असतात. या बाल आनंद मेळाव्याने विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळत असतो. केंद्र स्तरावरील अशा स्पर्धांमुळे विद्यार्थी घडत असतात. या स्पर्धातूनच विद्यार्थ्यांना धाडस निर्माण होत असते असे सांगत त्यांनी बाल आनंद मेळाव्याला शुभेच्छा दिल्या.

केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी प्रास्ताविकात बोलताना अशा कार्यक्रमासाठी नेहमीच सहकार्य करणारे विजयशेठ मेथा, कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी उपसरपंच नितीन दसवते यांच्यासह सहकार्य करणाऱ्या सर्वच माणगावकरांचे मनापासून आभार व्यक्त केले.

या मेळाव्यात केंद्र उतेखोल शाळेतील राजिप शाळा उतेखोल, विकास कॉलनी, गिरिजनवाडी, बामणोली,जुने माणगाव, खांदाड, कळमजे, नाणोरे, चव्हाणवाडी, खर्डी बुद्रुक, उतेखोलवाडी, उतेखोल आदिवासीवाडी, खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी या १३ शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अप्रतिम वेषभूषेसह सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून विविध गमतीशीर खेळांचाही मनमुराद आनंद घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रमेश उभारे व शिक्षिका विनया जाधव यांनी करून केंद्रप्रमुख शिंदे यांनी सर्व मान्यवर, मुख्याध्यापक, शिक्षक, पालकांचे आभार मानले.



# द. आफ्रिकेचा विंडीजवर झंझावाती विजय

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

ट्वेंटी-२० वर्ल्डकप स्पर्धेत वेस्ट इंडिजविरुद्धचा सुपर-८ फेरीचा सामना दक्षिण आफ्रिकेने नऊ विकेट राखून जिंकला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजने २० षटकांत आठ बाद १७६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने १६.१ षटकांत एक बाद १७७ धावा करून विजय मिळवत सेमी फायनलच्या दिशेने आणखी एक दमदार पाऊल टाकले.



वेस्ट इंडिजने दक्षिण आफ्रिकेसमोर १७७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग दक्षिण आफ्रिकेने एकच विकेट गमावत १६.१ षटकात पूर्ण केला. कर्णधार एडेन मार्करमने अर्धशतकी खेळी केली. मार्करम आणि क्विंटन डी कॉक यांनी आक्रमक सुरुवात केली होती. डी कॉकने स्फोटक फलंदाजी करताना मार्करमसोबत पहिल्या विकेटसाठी आठ षटकातच ९५ धावांची भागीदारी केली. तो २४ चेंडूत चार चौकार आणि चार षटकारांसह ४७ धावांची खेळी करून बाद झाला. त्यानंतर रायन रिकल्टनने कर्णधाराची दमदार साथ देत संघाला विजयापर्यंत पोहचवले. मारक्रमलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या वेस्ट इंडिजची सुरुवात एखाद्या दुस्वप्नासारखी झाली. सलामीवीर शाई होप (१६) आणि आक्रमक ब्रँडन किंग (२१) स्वस्तात बाद झाले. पाठोपाठ शिमरॉन हेटमायर, रोव्हमन पॉवेल आणि रोस्टन चेस हे तंबूत परतल्याने विंडीजचा डाव पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळणार असे वाटत होते. आफ्रिकेच्या लुंगी एनगिडी आणि कागिसो रबाडा यांनी विंडीजच्या फलंदाजीला खिंडार पाडले होते.

जेव्हा विंडीजची अवस्था ६ बाद ७१ अशी बिकट होती, तेव्हा अनुभवी जेसन होल्डर मैदानात उतरला. त्याने केवळ बचाव न करता आफ्रिकेच्या गोलंदाजांवर प्रतिहल्ला चढवला. होल्डरने ३१ चेंडूत तीन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ४९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्याला रोमॅरियो शेफर्डने मोलाची साथ दिली. शेफर्डने २३ चेंडूत नाबाद ३७ धावा फटकावत धावगती वाढवली. या दोघांनी आठव्या गड्यासाठी अवघ्या ५७ चेंडूत ८९ धावांची ऐतिहासिक भागीदारी केली. त्यामुळे वेस्ट इंडिजने २० षटकांत ८ बाद १७६ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारली होती, पण ती पुरेशी ठरली नाही.

# ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाचा वनडे मालिकेत भारतावर विजय

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारताचा महिला संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून दोन्ही संघांमध्ये मल्टीफॉरमॅट सिरीज खेळवली जात आहे. टी-२० मालिका आपल्या नावे केल्यानंतर आता वनडे मालिकेत वर्ल्ड चॅम्पियन असलेल्या भारतीय महिला संघाला पराभवाला सामोरे जावे लागले. दुसऱ्या वनडे सामन्यात टीम इंडियाचा ऑस्ट्रेलियाने विकेट्सने पराभव केला. यासह मालिकेतील सुरुवातीचे दोन्ही सामने जिंकत मालिका आपल्या नावे केली आहे.

भारताने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने एलिसा हिलीच्या रूपात मोठी विकेट गमावली, पण यानंतर फिबी लिचफिल्ड व जॉर्जिया वॉल यांनी संघाची धुरा सांभाळली. या दोघींनी दुसऱ्या विकेटसाठी ९४ चेंडूत ११९ धावांची भागीदारी रचली. लिचफिल्ड ६२ चेंडूत ११ चौकार व एका षटकारासह ८० धावा करत बाद झाली, तर जॉर्जिया वॉलने ८२ चेंडूत १३ चौकार व एका षटकारासह १०१ धावा करत शतकी खेळी केली. याशिवाय बेथ मुनी ३१ धावा करत माघारी परतली. यानंतर एश्ले गार्डनरने विजयी चौकार मारत संघाला ३६.१ षटरांत २५२ धावांचे आव्हान पार करून दिले.



भारताने दुसऱ्या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता, पण संघ २५१ धावा करू शकला. प्रतिका रावलने दुखापतीनंतर पुनरागमन करत ८१ चेंडूत सहा चौकारांसह ५२ धावांची खेळी केली. कर्णधार हरमनप्रीत कौरने ७० चेंडूत ५४ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून एनाबेल सदरलँड, एलाना किंग व एश्ले गार्डनर यांनी प्रत्येकी दोन, तर मेगन शट व निकोला कॅरे यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# वेस्ट इंडिजविरुद्धचा सामना भारतासाठी ठरणार निर्णायक



**कोलकाता : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकातील सुपर-८मध्ये भारताने झिम्बाब्वेविरुद्ध ७२ धावांनी दमदार विजय मिळवत सेमी फायनलची आशा कायम ठेवली आहे. चेन्नई येथे झालेल्या या सामन्यात सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारताने चमकदार कामगिरी केली. आता गट-१ मधून उरलेल्या एका सेमी फायनल जागेसाठी भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात थेट लढत होणार आहे. रविवारी, १ मार्च रोजी कोलकात्याच्या ईडन गार्डन्स येथे होणारा सामना निर्णायक ठरणार आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ७६ धावांनी झालेल्या पराभवानंतर भारताचा नेट रन रेट -३.८०० इतका घसरला होता, मात्र झिम्बाब्वेविरुद्धच्या मोठ्या विजयामुळे तो -०.१००वर आला. तरीही वेस्ट इंडिजचा नेट रन रेट +१.७९१ इतका मजबूत आहे. त्यामुळे पुढील सामना भारतासाठी 'करो या मरो' असणार आहे.

भारताने वेस्ट इंडिजवर विजय मिळवला, तर सुपर-८ मधील तीन सामन्यांत चार गुणांसह तो थेट सेमी फायनलमध्ये प्रवेश करेल. भारताचा पराभव झाल्यास त्यांचा प्रवास येथेच संपेल आणि वेस्ट इंडिज पुढे जाईल. जर पावसामुळे सामना अनिर्णित राहिला, तर दोन्ही संघांचे तीन गुण होतील, मात्र चांगल्या नेट रन रेटमुळे वेस्ट इंडिजला सेमी फायनलचे तिकीट मिळेल आणि भारत स्पर्धेबाहेर जाईल. त्यामुळे आता सर्वांच्या नजरा या सामन्याकडे आहेत.

# मुलीचे नाव ठेवले समायरा; 'हिटमॅन' चाहत्यावर खूष

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार आणि 'हिटमॅन' म्हणून ओळखला जाणारा रोहित शर्मा सध्या सोशल मीडियावर एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आलाय. क्रिकेटच्या मैदानावर आपल्या बॅटने धावांचा पाऊस पाडणाऱ्या रोहितने आपल्या एका मराठमोळ्या चाहत्याला दिलेल्या खास सरप्राईजमुळे तो क्रिकेट फॅन्सच्या गळ्यातील ताईत बनला आहे.



झाले असे की, गीतेश ठाकूर आणि ममता म्हात्रे ठाकूर हे जोडपे रोहित शर्माचे मोठे फॅन. नुकतेच त्यांना कन्यारत्न प्राप्त झाले. आपल्या लाडक्या खेळाडूवरील प्रेमापोटी त्यांनी आपल्या मुलीचे नावही रोहितच्या मुलीच्या नावावरून 'समायरा' असे ठेवले. विशेष म्हणजे या चिमुकलीचे बारसेदेखील अगदी रोहित शर्माच्या स्टाईलने साजरे करण्यात आले. रोहित शर्माने स्लो मोशनमध्ये वर्ल्डकपची ट्रॉफी स्वीकारली होती. त्याचीच नक्कल करत गीतेश ठाकूर यांनी मुलीच्या नावाचे बारसे केले. रोहितच्या ४५ नंबरची जर्सी त्यांनी उघड केली, तेव्हा त्यावर समायरा लिहिलेले होते.

या बारशाचा व्हिडीओ सोशल मीडियाच्या माध्यमातून रोहित शर्मापर्यंत पोहचला. आपल्या चाहत्याचे हे प्रेम पाहून रोहितही भारावून गेला. त्याने केवळ दखलच घेतली नाही, तर ठाकूर कुटुंबासाठी एक खास व्हिडीओ संदेश पाठवला. विशेष म्हणजे रोहितने आपल्या चाहत्यांना मराठीतून शुभेच्छा दिल्या.

'ठाकूर फॅमिली, तुम्हाला आमच्या शर्मा घरातून भरपूर शुभेच्छा.. तुम्हाला मुलगी झाली आम्हाला हे ऐकून बरे वाटले. ऑल द बेस्ट.. मुलीला आणि तुम्हाला भविष्यासाठी शुभेच्छा,' अशा शब्दांत रोहित शर्माने आपल्या भावना व्यक्त केल्या.

**माणुसकीचाही राजा**

रोहित शर्माचा हा व्हिडीओ संदेश पाहून ठाकूर कुटुंब भारावून गेले आहे. टी-२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर जो आनंद झाला होता, तसाच अनुभव रोहितच्या फॅन्सनी साजरा केला. सोशल मीडियावर हा व्हिडीओ सध्या तुफान व्हायरल होत असून, 'मुंबईचा राजा' हा केवळ मैदानाचा नाही, तर माणुसकीचाही राजा आहे, अशा कमेंट्स चाहत्यांकडून येत आहेत.

# संजू सॅमसनने रोहितला टाकले मागे

**चेन्नई : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वेविरुद्धच्या सुपर-८ लढतीत भारतीय यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसनने मैदानात पाऊल ठेवताच इतिहासाला गवसणी घातली. सामन्याच्या पहिल्याच षटकात षटकार ठोकून संजूने एका खास विक्रमाची नोंद केली असून टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या षटकात सर्वाधिक षटकार मारणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे.

टी-२० विश्वचषकात झिम्बाब्वेविरुद्ध संजू सॅमसनला भारतीय अंतिम अकरामध्ये स्थान मिळाले आणि सलामीवीर म्हणून बढतीही दिली गेली. संजूने या संधीचे सोने करत डावाच्या पहिल्याच षटकातील दुसऱ्या चेंडूवर उत्तुंग षटकार खेचून आपले खाते उघडले. संजूने १५ चेंडूंत २४ धावांची छोटी पण वेगवान खेळी केली, ज्यामध्ये एक चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. १६०.००च्या स्ट्राईक रेटने खेळणाऱ्या संजूने या खेळीत रोहित शर्मा आणि इशान किशन यांसारख्या दिग्गजांचे विक्रम मोडीत काढले.

टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या षटकात दोन वेळा षटकार ठोकणारा संजू हा आता भारताचा एकमेव फलंदाज ठरला आहे. यापूर्वी युसूफ पठाण, मुरली विजय, रोहित शर्मा आणि इशान किशन यांनी विश्वचषकाच्या पहिल्या षटकात प्रत्येकी एक षटकार लगावला होता. संजूने या स्पर्धेत नामिबियाविरुद्ध पहिल्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर षटकार मारला होता आणि आता झिम्बाब्वेविरुद्ध रिचर्ड नगारवाच्या दुसऱ्याच चेंडूवर षटकार ठोकून त्याने आपला दुसरा 'ओपनिंग ओव्हर' षटकार नोंदवला.

# श्रीलंकेच्या पॅकअप्नंतर संगकाराचा संताप

**कोलंबो : वृत्तसंस्था**

यंदाच्या टी-२० विश्वचषकाचे यजमानपद भूषवणाऱ्या श्रीलंकेचे या स्पर्धेतील आव्हान बुधवारी (दि. २५) संपुष्टात आले. आर.प्रेमदासा स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या मानहानीकारक पराभवानंतर श्रीलंकेचा दिग्गज क्रिकेटपटू कुमार संगकाराने आपला संताप व्यक्त केला आहे.



१६९ धावांचे लक्ष्य गाठताना श्रीलंकेचा संघ अवघ्या १०७ धावांत गारद झाला. सुपर-८ फेरीतील हा त्यांचा सलग दुसरा पराभव असून या फेरीतून बाहेर पडणारा श्रीलंका हा पहिला संघ ठरला आहे. २०१४मध्ये विश्वविजेतेपद पटकावल्यानंतर सलग पाचव्यांदा श्रीलंकेला उपांत्य फेरी गाठण्यात अपयश आले आहे. संगकाराने या अपयशानंतर अत्यंत तीव्र शब्दांत आपली नाराजी व्यक्त केली. २००९ ते २०१४ या श्रीलंकेच्या सुवर्णकाळात संगकारा संघाचा अविभाज्य भाग होता. त्या काळात संघाने सलग चार वेळा उपांत्य फेरी गाठली होती, ज्यात दोन वेळा उपविजेतेपद आणि एकदा विश्वविजेतेपदाचा समावेश होता.

आपल्या भावना व्यक्त करताना संगकाराने ट्विट केले की, सध्या सर्वत्र निराशेचे वातावरण आहे. चाहते हताश आणि संतप्त आहेत. खेळाडूंनाही या पराभवाच्या वेदना होत आहेत. मी अशा परिस्थितीतून गेलो असल्याने मला खेळाडूंच्या मानसिकतेची जाणीव आहे, हे नक्कीच सोपे नाही.

केवळ सहानुभूती न दाखवता संगकाराने संघाच्या वारंवार होणाऱ्या चुकांवर कडक शब्दांत टीका केली. तो म्हणाला, देशाचे आणि जनतेचे प्रतिनिधित्व करणे ही एक मोठी जबाबदारी आणि सन्मान आहे. परिस्थिती सुधारण्यासाठी आता सर्व स्तरांवर काम करण्याची गरज आहे. जागतिक क्रिकेट वेगाने बदलत असताना आपण त्याच जुन्या चुका करून वेगळ्या निकालाची अपेक्षा करू शकत नाही. आपण आधुनिक क्रिकेटशी जुळवून घेण्यात अपयशी ठरलो आहोत आणि हीच आपली सर्वात मोठी घसरण आहे.

### कामगिरीत सातत्याचा अभाव

गट साखळीत ऑस्ट्रेलियावर मिळवलेला विजय वगळता संपूर्ण स्पर्धेत श्रीलंकेच्या कामगिरीत सातत्याचा अभाव दिसून आला. झिम्बाब्वेविरुद्ध पराभव पत्करावा लागूनही संघाने सुपर-८मध्ये धडक मारली होती, मात्र सुपर-८ मध्ये इंग्लंडविरुद्ध १४५ धावांचा पाठलाग करताना त्यांचा डाव ९५ धावांवरच आटोपला होता आणि आता न्यूझीलंडविरुद्धही फलंदाजीच्या त्याच कमकुवतपणाचा फटका त्यांना बसला.

# क्रिकेटपटू रिंकू सिंहच्या वडिलांचे निधन

**नोएडा : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटपटू रिंकू सिंह याच्या वडिलांचे निधन झाले आहे. रिंकूचे वडील खाचंद्र सिंह हे यकृताच्या कर्करोगाशी झुंजत होते. मागील काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांनी ग्रेटर नोएडा येथील यथार्थ रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.

खाचंद्र सिंह अनेक दिवसांपासून मेकॅनिकल व्हेंटिलेटर सपोर्टवर होते आणि त्यांना सतत रेनल रिप्लेसमेंट थेरपी दिली जात होती. त्यामुळे टी-२० विश्वचषकातील टीम इंडियाच्या महत्त्वाच्या खेळाडूंपैकी एक असलेला रिंकू सिंह दोन दिवसांपूर्वी घरी परतला होता. तो उत्तर प्रदेशातील अलिगडचा रहिवासी आहे.

# अभिषेक फॉर्ममध्ये परतताच युवराजची भावूक पोस्ट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्माला टी-२० विश्वचषकात अखेरीस सूर गवसला आहे. अभिषेकने झिम्बाब्वेविरुद्ध अर्धशतकी खेळी साकारली. तीन वेळा शुन्यावर बाद झाल्यानंतर केलेल्या या खेळीनंतर त्याचा गुरू युवराज सिंगने त्याच्यासाठी खास पोस्ट शेअर केली आहे.



जगातील नंबर वन टी-२० फलंदाज असलेला अभिषेक शर्मा सलग तीन डावात शून्यावर बाद झाला होता. भारतीय संघासाठी हा सामना करो या मरो स्थितीतील होता आणि मोक्याच्या क्षणी त्याच्या बॅटमधून आलेल्या धावा संघासाठी महत्त्वाच्या ठरल्या.

युवराजने त्याच्या इन्टाग्राम स्टोरीवर लिहिले, सर्वात चांगली गोष्ट म्हणजे जेव्हा तुमची बॅट सर्व काही बोलते! शानदार खेळी सर अभिषेक, असाच पुढे जात रहा.

युवराज सिंगच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक शर्माने क्रिकेटचे धडे गिरवले आहेत. अभिषेकने टी-२० विश्वचषकात केलेली कामगिरी पाहून युवराजने आनंदी होत ही पोस्ट शेअर केली.

# महाराष्ट्र कबड्डी संघाची राष्ट्रीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक



**वडोदरा : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राने ७२व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत अंतिम फेरी गाठली. महाराष्ट्राची गाठ चंदीगड व भारतीय रेल्वे यांच्यातील विजयी संघाशी पडेल.

वडोदरा येथील सागा बंदिस्त क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या उपांत्य सामन्यात महाराष्ट्राने उत्तर प्रदेश संघाचे कडवे आव्हान ४९-३६ असे परतवून लावले. चरखी (हरियाणा) येथे जुलै २०२२ साली झालेल्या ६८व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत ही किमया साधली होती. महाराष्ट्राने झोकात सुरुवात करीत उत्तर प्रदेशवर लोण देत १२-०७ अशी आघाडी घेतली. विश्रांतीला २८-२२ अशी आघाडी राखत आपला इरादा स्पष्ट केला. विश्रांतीनंतरच्या खेळात आपल्या हातून ही आघाडी निसटणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली. शेवटची तीन मिनिटे पुकारली तेव्हा ४४-३४ अशी महाराष्ट्राकडे आघाडी होती. या सामन्यात बचाव भक्कम झाला. अस्लम इनामदार, आदित्य शिंदे, शुभम पाठरे यांच्या संयमी चढायांना संकेत सावंत, जयेश महाजन यांची मिळालेली पकडीची उत्तम साथ यामुळे हा विजय मिळविता आला.


||५६ वे पुण्यस्मरण||

''सर्व काही असूनही, काहीच नसल्यासारखे आहे...
सर्व सुखांनी भरलेले हे कुटुंब, आपल्यावाचून अपुरे आहे...
आपल्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली''



कै. हरी काना ठाकूर

आपले विनीत

श्री. रामशेठ ठाकूर, श्री. काना हरि ठाकूर,
श्री. अरुण हरि ठाकूर, सौ. तुळसाबाई गो. घरत आणि ठाकूर परिवार, पनवेल.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com